cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार.....

www.epaper.rajyaloktantra.com email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१७१ | शनिवार, दि.१२ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


दशमीचे दिवशी अंबा निघे सीमोल्लंघनी हो ।
सिंहारूढ करी शस्त्रे सवळ ती घेऊनी हो ।।
शुभानिशुभांदीक राक्षस सर्वही मारूनी रणी हो ।।
विप्र रामदासा आश्रय दिधला निज चरणी हो ।।

विजयादशमीच्या सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !
-संपादक

# सोयाबीनमुळे शेतकऱ्यांचे गणित बिघडले

## हमी भावातून उत्पन्न खर्चही निघेना, सहा हजाराचा दर देण्याची गरज

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

मागील दोन वर्षापासून सोयाबीन पिकाने शेतकऱ्यांची अडचण वाढवली आहे. या पिकाला मिळत असलेल्या अल्प दरामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. सोयाबीनच्या लागवडीला लागणारा खर्च आणि मिळत असलेला भाव यात शेतकरी भरडल्या जात आहे. सध्या



बाजारात सोयाबीनला अवघा ४ हजार ते साडेचार हजार दर मिळत आहे. मात्र याचा उत्पादन खर्च यापेक्षाही जास्त आहे.

### सहा हजार दराची मागणी करणारेच आता सत्तेत

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी लातूर ते औरंगाबाद अशी सोयाबीन दिंडी काढली होती. तेव्हा सोयाबीनला किमान सहा हजार रुपये दर देण्याची मागणी केली होती. मात्र आता तब्बल दहा वर्षानंतरही हे दर सहा हजारावर पोहोचू शकले नाहीत आणि मागणी करणारेच सत्तेत आहेत मात्र ते ही बाब सपशेल विसरले आहेत.

दुसरीकडे सरकारने जाहीर केलेला हमीभाव बाजारात मिळणे कठीण झाले असून, जरी तेवढा भाव दिला तरी तो अपुरा पडत आहे. यामुळे हमीभाव हा सहा हजारपर्यंत वाढविण्यात यावा, अशी मागणी आणि अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

केंद्र सरकारने सोयाबीनला ४,८८२ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. मात्र बाजारात हा हमी भावही मिळणे कठीण झाले आहे. वास्तवीक हा हमीभावही अत्यल्प असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना किमान ६००० रुपये

◀◀ पान २ वर

### विधानसभेच्या तोंडावर मलमपट्टी

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सोयाबीनच्या दराचा मुद्दा चांगलाच गाजला होता. सोयाबीन पट्ट्यात भाजपला याचा मोठा फटका बसल्याचे दिसून आले. आता विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान देऊ केले. तर सोयाबीनच्या तेलावरील आयात शुल्कातही २० टक्क्याने वाढ केली आहे. मात्र शेतकऱ्यांना याचा फायदा तात्काळ मिळणे कठीण दिसत आहे. उलट हा निर्णय घेताच खाद्य तेलाचे दर मात्र वाढले आहेत.

## नारायणगड दसरा मेळाव्याकडे राज्याचे लक्ष


# मनोज जरांगे पाटील लुटणार विचारांचे सोने

### राज्यभरातील कोट्यवधी भाविकांचा नारायणगडाकडे ओघ

**बीड । प्रतिनिधी**

कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र नारायण गड येथे मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत यावर्षी ऐतिहासिक दसरा मेळावा होत असून ते विचारांचे सोने लुटणार आहेत. या मेळाव्याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. हजरो भाविकांच्या रात्रंदिवस केलेल्या श्रमदानातून मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून राज्याभरातील भाविकांचा श्री क्षेत्र नारायण गड येथे ओघ असून भाविकांसाठी सर्व सुविधा केल्या

◀◀ पान २ वर



# राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जन्मगांवी आज भक्ती आणि शक्तीचा विराट संगम

## पंकजाताई मुंडेंच्या दसरा मेळाव्याला उसळणार लाखोंचा जनसागर




### शिदोरी बांधून, शांततेने, वेळेवर स्वत:ची काळजी घेत भगवान भक्तीगडावर या; पंकजाताईंचं कार्यकर्त्यांना आवाहन

**पाटोदा । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जन्मगांवी सावरगांव येथे आज भक्ती आणि शक्तीचा विराट संगम पहायला मिळणार आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या पारंपारिक दसरा मेळाव्याला लाखोंचा जनसागर उसळणार आहे.

दरम्यान, दसरा मेळाव्याची परंपरा पुढे सुरू ठेवण्यासाठी शांततेत, वाहने हळू चालवत, घरची भाकरी, चटणी शिदोरी आणि पाण्याची बाटली घेऊन स्वत:ची काळजी घेत भगवान भक्तीगडावर वेळेत या, असं

◀◀ पान २ वर



## पालकमंत्री धनंजय मुंडेंचा विकासनिधी खेचून आणण्याचा धडाका सुरूच

# लमाण तांड्यांच्या विकासासाठी ९.५० कोटी निधी मंजूर

### ग्रामविकास विभागाकडून शासन निर्णय निर्गमित



**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी विविध विभागाच्या मार्फत बीड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील विकास कामांना निधी खेचून आणण्याचा धडाकाच सुरू केला आहे. ग्रामविकास विभागाच्या संत सेवालाल महाराज बंजारा/ लमाण तांडा समृद्धी योजनेतून परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील बंजारा/लमाण तांड्यांच्या विकासासाठी नऊ कोटी पन्नास लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून

◀◀ पान २ वर

# टाटा समूहाची धुरा नोएल टाटा यांच्या खांद्यावर

**मुंबई । प्रतिनिधी**

रतन टाटांचे सावत्र बंधू नोएल टाटांची शुक्रवारी टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. रतन टाटा यांच्या निधनानंतर त्यांचा उत्तराधिकारी नेमण्यासाठी शुक्रवारी सकाळी टाटा ट्रस्टच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत टाटा समूहाची धुरा नोएल टाटा यांच्या खांद्यावर सोपवण्यात आली. टाटा ट्रस्टमध्ये समावेश असलेल्या विविध ट्रस्टच्या विश्वस्तांची शुक्रवारी मुंबईत संयुक्त बैठक झाली. यावेळी रतन टाटा यांच्या



◀◀ पान २ वर

# डॉ.क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघासाठी वर्षातच आणला २५ कोटींचा निधी

### अजितदादा, धनुभाऊंमुळे बीड मतदारसंघाच्या विकासाला गती

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघासाठी मला निधी मिळत नाही म्हणून बीडच्या आमदारांचे सतत रडगाणे सुरू होते. परंतु त्यांना जे जमले नाही, ते राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी वर्षभरातच करून दाखविले. त्यांनी



राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर वर्षभरातच उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार,

◀◀ पान २ वर

### सुटीची सूचना

आज दि. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी विजयादशमी निमित्त दै.राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या दि.१३ ऑक्टोबर २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार व एजंट यांनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

# आजी,माजी आमदारांचे शेतकरी, सर्वसामान्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष-माजी राज्यमंत्री सुरेश धस

### जनतेशी नाळ जोडलेला विकासाभिमुख नेता सुरेश धस-चंदूलाल साहू

**आष्टी । प्रतिनिधी**

सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये आपला अल्पशा मताने पराभव झाला त्यानंतर गेल्या दहा वर्षातील आष्टी विधानसभा मतदारसंघातील आजी आणि माजी आमदारांनी सर्वसामान्य



जनता आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही परंतु आपण या आमदारांची उणीव भासू दिली नाही सतत सर्वसामान्य जनतेच्या, शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करत असून दैनंदिन सुखदु:खात सहभागी होत असतो असे प्रतिपादन

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: २.५० क्विंटल | २,६८१ | २,७०० | २,६९३ |
| ज्वारी/हायब्रिड :७८.०० क्विंटल | २,१४० | २,७०० | २,२६९ |
| मूग : २.५० क्विंटल | ६,४०० | ६,८५१ | ६,६२५ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : ७१.५० क्विंटल | ३,६५१ | ७,६०० | ६,६३३ |
| बाजरी : १९.५० क्विंटल | २,०११ | २,६९१ | २,४१० |
| मुग : २८.५० क्विंटल | ६,३०० | ७,२०० | ६,८४३ |
| सोयाबीन: ८०३.५० क्विंटल | ३,००० | ४,५०० | ३,९३० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |

## राज्य सरकार राबविणार 'घर घर संविधान' उपक्रम

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्य सरकारने २०२४-२५ मध्ये संविधानाच्या ७५ व्या वर्षानिमित्त शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये 'घर घर संविधान' (प्रत्येक घरात संविधान) हा विशेष उपक्रम

◀◀ पान २ वर

## दिल्लीतून दोन हजार कोटी रुपयांचे कोकेन जप्त

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने दिल्लीतून २ हजार कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले आहे. सुमारे २०० किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने रमेश नगर भागातील एका गोदामातून ते जप्त केले. यासह आतापर्यंत ७ हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात

◀◀ पान २ वर

# लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ; महिला भगिनींना आणखी एक संधी



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्याची मुदत आता १५ ऑक्टोंबरपर्यंत वाढवली आहे. त्यामुळे, ज्या महिला भगिनींनी लाडकी बहीण योजनेसाठी अद्याप अर्ज भरले नाहीत,

◀◀ पान २ वर

### २ कोटी ३० लाख महिलांना योजनेचा लाभ

राज्यात आत्तापर्यंत २ कोटी ३० लाख बहिणींच्या खात्यात पाच हप्ते जमा झाले आहेत. जवळपास १७००० कोटी रुपयांचे वितरण सरकारने लाडक्या बहिणींना केले असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. आमची देण्याची वृत्ती आहे. ही योजना बंद पडणार नसल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. हे सरकार ॲडव्हान्समध्ये देणारे सरकार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. या योजनेमुळं विरोधकांची तोंडे काळी झाली असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.






cmyk

## अग्रलेख

# सगळ्यांचेच शक्ती प्रदर्शन

महाराष्ट्रातील निवडणूक अधिक चुरशीची होईल अशी शक्यता दिसते आहे. हरियाणा निकालावर शिवसेना ठाकरे गटाची प्रतिक्रिया काँग्रेसला दुषणं देणारी, जबाबदार ठरवणारी आहे. आणि त्याचा संबंध मोठा भाऊ व चेहरा यांच्याशी संबंधित आहे. पण काँग्रेस आणि काँग्रेसचे महाराष्ट्रातील पुढारी अशा कोणत्याही टीका टिपणीला भीक घालतील अशी सूतराम शक्यता नाही. काँग्रेस नेत्यांनी 'सांगली पॅटर्न' हे नवे अस्त्र शोधून काढले आहे ते ठाकरी बळजोरीला व पवार शिरजोरीला उतारा ठरते.

लोकसभा निवडणूकीत शक्ती नसताना शिवसेनेने सांगलीची जागा हिसकावून घेतली. एकतर्फी उमेदवार जाहीर केला तेव्हा काँग्रेसजन एकत्र आले व त्यांनी विशाल पाटील यांना अपक्ष म्हणून उभे केले व निवडून आणले. आता विधानसभा निवडणूकीत तोच सांगली पॅटर्न राज्यात पाच पंचवीस जागी दिसला तर आश्चर्य वाटू नये. महायुती आणि महाआघाडी यांच्यातील आपसातील जागावाटप बोलणी अंतिम टप्प्यात आहेत. महायुतीत दोनशे जागांचे तर महाआघाडीत दिडशे जागांचे वाटप पक्के मानले जाते आहे. महायुतीत ४५ जागा अजितदादांना ८० जागा एकनाथ शिंदे यांना व उर्वरित जागा भाजपाला असे सूत्र दिसते आहे. अजितदादांची तळ्यात मळ्यात वक्तव्ये आणि शिवसेना ठाकरे गटाकडून काँग्रेसवर होणारी आगपाखड पाहता निवडणूक उभी राहीपर्यंत आणि निकालानंतर काय होणार हे सांगणे कोणालाच शक्य नाही. कारण काहीही करुन सत्तेत आणि मालामाल खुर्ची हेच सर्वांचे ध्येय आहे. त्यामुळे गेल्या निवडणूकीत महायुतीतून निवडून येऊन महाआघाडीशी जशी ठाकरे गटाने मिठी मारली व मुख्यमंत्रीपदाची खुर्ची मिळवली तोच कित्ता राज्यात कुणीही गिरवू शकतो.

काँग्रेसने शिवसेनेला मोठा भाऊ आणि उद्धव ठाकरेंना निवडणूक चेहरा मानायला ठाम नकार दिला आहे. शिवसेनेची गरज संपली अशी काँग्रेसची वर्तणूक आहे. पण शिवसेनेला आतले डाव, बाहेरचे डाव पक्के पाठ आहेत. आमदारांचे हुकमी संख्याबळ मिळवण्याकडे ठाकरेंचे प्राधान्य आहे हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही, काँग्रेसकडे जसा सांगली पॅटर्न तसा शिवसेनेकडे ठाकरे पॅटर्न आहे. पवार पॅटर्न तर कुणाला कळण्यापलीकडे असतो. काँग्रेस १०५, शिवसेना ठाकरे १०० जागा आणि राष्ट्रवादी ८३ जागा असा तेथे फॉर्म्युला दिसतो आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांचे ४० आमदार त्यांना सोडून अजितदादासोबत गेले, ती पोकळी शरद पवारांनी भरुन काढली आहे. जागोजागचे सरदार त्यांनी पक्षात घेऊन आपला तंबू निवडणूकीसाठी सज्ज केला आहे. तुलनेत शिवसेना आमदारांचा रिक्त जागा ठाकरे भरू शकलेले नाहीत.

आज दसरा मेळावे होतील. त्यामध्ये ठाकरे, शिंदे, पंकजा मुंडे, मनोज जरांगे आणि रास्वसंघ धनगर समाज आदी मेळावे लक्षवेधी ठरतील, यातील राजकीय पक्षांचे मेळावे हे शक्ती प्रदर्शन करतीलच. जोडीला निवडणूक व निवडणूकीनंतरची रणनीती यांचे संकेत दिले जातील. हरियाणा निकालानंतर महायुतीचा विश्वास आणि उत्साह वाढला आहे. लाडकी बहिणचे पैसे खात्यावर जमा होत असलेने बहिणी पाठराखण करतील असा विश्वास निर्माण झाला आहे, शेती आणि शेतकरी यांना प्रोत्साहन दिले जाते आहे. सर्व माध्यमात जाहिरातींचा मारा सुरु आहे. या पार्श्वभूमीवर हरियाणा निकाल पथ्यावर पडल्याने महायुतीत विश्वास आणि उत्साह दुणावला आहे. या निकालाचा आउटगोईंगवरही परिणाम शक्य आहे. ओघानेच महायुती उत्साहात आहे, तर महाआघाडीचे म्हणणे, भाजपा विरोधात सर्व पक्ष एकत्र येतात तेथे भाजपाचा पराभव अटळ असतो. जागांसाठी न भांडता जिंकण्यासाठी पावले टाका असा सल्ला शरद पवारांनी दिला आहे.

हरियाणा आणि महाराष्ट्र दोन्ही कडची सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैचारिक परिस्थिती वेगळी. महाराष्ट्रात आज जी राजकीय परिस्थिती आहे आणि राजकारणाचा चिखल करुन रोज एकमेकांवर तो फेकला जातोय तशी राजकीय परिस्थिती देशात आणि महाराष्ट्रात यापूर्वी कधीही कुठेही नव्हती. पूर्वी महाराष्ट्रात एका पक्षाला सत्ता मिळत असे. मग एकविचाराची सत्ता येऊ लागली. दुचाकी सत्ता, नंतर तीन चाकी रिक्षाची सत्ता आणि यावेळी तीन चाकावर भागते का चारचाकी गाडी होते हे बघावे लागणार आहे. अपक्ष आणि छोटे पक्ष, तिसरी आघाडी, मनसे असे छोटे छोटे घटक व ओबीसी, मराठा, सुराज्य, जनसुराज्य अशा संघटनांनाही महत्त्व येण्याची शक्यता आहे. हरियाणा निवडणूकीत डबल इंजिन ही भूमिका महत्त्वाची ठरली. ओघाने निवडणूकीवर परिणाम करणारे अनेक घटक आहेत. तूर्त हरियाणा निवडणूक निकालाने महायुतीच्या कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला आहे तर आघाडी सावध झाली आहे. मतदार काय करणार हे स्वतंत्र प्रकरण आहे.

---

# शैलेश आंधळे यांचा महिला पत्रकार गितांजली लव्हाळे यांच्याकडून सत्कार

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कॉलेजच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन व मोटिवेशन करण्यासाठी नुकत्याच ज्यांनी २०२३ च्या एमपीएससी परीक्षेमध्ये राज्यातून ४४ वा क्रमांक पटकावून क्लास वन अधिकारी पदाला गवसणी घालणारे चि.शैलेश भिकाराम आंधळे यांचा मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संचालक इंजि. अशोक भैय्या आंधळे तसेच वडवणी तालुक्यातील प्रथम महिला पत्रकार सौ.गितांजली लव्हाळे मॅडम,प्रा.अंडील सर उपस्थित होते. महिला पत्रकार सौ.गितांजली लव्हाळे मॅडम यांनी चि.शैलेश आंधळे यांचा शाल,ग्रंथ,दै.लोकनायकचा अंक भेट देऊन सत्कार केला. पत्रकार गितांजली लव्हाळे मॅडम शुभेच्छा पर विचार व्यक्त करताना त्या म्हणाल्या की,ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्याने किती मोठ यश संपादन केल आहे आपल्या वडवणी तालुक्याचे नाव राज्यात रोशन केल आहे त्यांचा मला अभिमान आहे एमपीएससी परीक्षेतील या यशाबद्दल मी शैलेश आंधळे यांच अभिनंदन करते व पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देते त्यांचा आदर्श सर्व विद्यार्थ्यांनी घ्या असे विचार त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक शैलेश आंधळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की,पुस्तकाची कमीत कमी पाच पानं तरी दिवसातून वाचावीत व वाचलेल्या पानावर वहीत लिहावे तसेच त्यावर चर्चा करावी हे त्रिसूत्र तुम्हाला यशापर्यंत नेल्याशिवाय राहणार नाही अपयशाला खचून जाऊ नका ते आपल्याला खूप काही शिकवते अपयश ही यशाची पहिली पायरी आहे अशा प्रकारे सविस्तर मार्गदर्शन करून मोटिवेशन विद्यार्थ्यांचे केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील उच्च माध्यमिकच्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

---

# दसऱ्यानिमित्त सीमोल्लंघनास निघणाऱ्या श्री योगेश्वरी देवीच्या पालखी सोहळ्यात देवी भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहराचे ग्रामदैवत माता श्री योगेश्वरी देवीचा नवरात्र उत्सव हा दि ३ ऑक्टोबर ते१२ ऑक्टोबर यादरम्यान संपन्न होत आहे. शुक्रवार दि ११ रोजी म्हणजेच नवमीच्या दिवशी जिल्हाधिकारी श्री व सौ अविनाश पाठक यांच्या हस्ते विधिवत पूजा,होमहवन होऊन पूर्णाहुती देण्यात आली. शनिवार दि १२ रोजी दसऱ्यानिमित्ताने माता श्री योगेश्वरी देवीचा सीमोल्लंघन पालखी सोहळा संपन्न होणार आहे . देवीच्या या पालखी सोहळ्यात जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन माजी नगराध्यक्ष तथा श्री योगेश्वरी देवल कमिटीचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले आहे. देवीची पालखी शनिवारी दुपारी १वाजता मंदिरातून निघून प्रतिवर्षी ठरलेल्या नियोजित मार्गावरून सीमोल्लंघनास निघणार असल्याचे देखील राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

देवीच्या नवरात्र उत्सवाच्या काळात अनेक जगविख्यात ख्याती प्राप्त कलाकारांनी मंदिर परिसरात येऊन आपली कला सादर केली. यामध्ये प्रामुख्याने भरत नाट्य, गायन , वादन यांचा समावेश असून विविध भजनी मंडळ यांच्याकडून देखील भजन, कीर्तन , प्रवचन तथा अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमाचा आनंद व आस्वाद येथील देवीच्या भक्तगणांनी



घेतला. याच प्रकारचा आनंद देवीच्या सीमोल्लंघनानिमित्ताने निघणाऱ्या देवीच्या पालखी सोहळ्यात देखील सहभागी व्हावे असे आवाहन राजकिशोर मोदी केले आहे. भाविकांनी नवरात्र उत्सवात ज्या प्रमाणे शिस्त व शांतता पाळून मंदिर प्रशासनास सहकार्य केले त्याचप्रमाणे देवीच्या या पालखी सोहळ्यात देखील सहकार्य करावे आणि आपल्या दसरा या अतिशय पवित्र अशा सणाचा व देवीच्या सीमोल्लंघन सोहळ्यात प्रेमरूपी सोने चांदी लुटत आपल्या मित्रपरिवार व कुटुंबियांसोबत आनंद घ्यावा अशी विनंती देखील देवल कमिटीचे उपाध्यक्ष राजकीशोर मोदी यांनी केले आहे.

---

# राष्ट्रीय क्रांती सेनेचा १४ ऑक्टोबर रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव, धारूर, वडवणी या प्रत्येक तालुक्याला एक हजार कोटीचे पॅकेज देऊन पंचतारांकीत औधोगिक क्षेत्र निर्माण करून मोठ मोठे उद्योग आणण्यात यावे तसेच रामगीरी महाराज व नितेश राणे यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी, ओबीसी व मुस्लिम समाजाला लोकसभेत व विधानसभेत राजकीय आरक्षण देऊन एस.सी. एस.टी. च्या धरतीवर जागा आरक्षीत करण्यात याव्यात या मागण्यांसाठी दि. १४/१०/१०२४ रोजी राष्ट्रीय क्रांती सेनेचा उपविभागीय कार्यालय माजलगाव येथे धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाचे नेतृत्व राष्ट्रीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे यांच्या नेतृत्वात होणारा असून या मोर्चास हाजोरोच्या संखेने ऊपस्थीत राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.**

माजलगाव मतदार संघा मध्ये पंचतारीकी औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्यासाठी मोठ मोठे उद्योग आणण्यात यावे. म्हणजे येथील सुशिक्षित बेरोजगार, ऊसतोड कामगारांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होईल. व येथील सुशिक्षित बेरोजगारांचे व ऊसतोड मजुरांचे पर जिल्ह्यात परराज्यात स्थलांतर होणार नाही. यासाठी राष्ट्रीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे याच्या नेतृत्वाखाली सरकारने विशेष पॅकेज द्यावे. या साठी धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. माजलगाव मतदारसंघा मध्ये सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम नसल्यामुळे बेरोजगार तरुणांची फार मोठ्या प्रमाणात संख्या वाढत चालली आहे. माजलगाव मतदारसंघात अंदाजे दीड लाख ते एक लाख सत्तर हजार लोक ऊस तोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक राज्यासह इतर राज्यामध्ये स्थालांतरीत होतात. तसेच येथील बेरोजगारांना टेकनिकल कुशल कारागीर आणि अकुशल कारागीर यांना पुणे, सुरत, याठिकाणी पोटाचाउदारगिवाह करण्यासाठी कामाला जावे लागत आहे. माजलगाव मतदारसंघात औरंगाबाद सारखी पंचतारांकीत औद्योगगक क्षेत्र निर्माण करण्याची गरज आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये औद्योगगक क्षेत्र निर्माण करण्यात यावे. माजलगाव मतदारसंघात स्थायिक उद्योजकांना ५०% उद्योग निर्माण करण्यासाठी अनुदान देण्यात यावे. बाहेरून येणाऱ्या उद्योजकांसाठी विज, जी.एस.टी., इन्कम टॅक्स टॅक्स व कमी दरात त्यांना औद्योगिक क्षेत्रातील जमीन उपलब्ध करून देण्यात यावी. त्यामळे मोठे उद्योजक, स्थागिक उद्योजकांना उद्योग उभारण्यासाठी प्रशिक्षण फ्री मध्ये उपलब्ध करूण देण्यात यावे. मुस्लिम ओ.बी.सी. समाजाला विधानसभा व लोकसभा एस.सी.एस.टी. च्या धरतीवर राजकीय आरक्षण देऊन लोकसंखे नुसार लोकसभा व विधानसभा आरक्षित करण्यात याव्यात. यासाठी माजलगाव मतदारसंघात तिन्ही तालुक्याला प्रत्येकी एक एक हजार कोटीचेपॅके देण्यात यावे. टोटल मतदारसंघात तीन हजार कोटीचेपॅकेज राज्य व कें द्र सरकारने द्यावे. वरील मागण्यांचा सकारात्मक विचार सरकारने करणे, अत्यंत गरजेचे आहे. जिल्ह्यातील वाढत चाललेली गुन्हेगारी बेरोजगारी, मागासलेपणा, आत्महत्येचे वाढलेलेप्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा पूर्णतः हा शेतीवर अवलंबून असल्यामुळे औद्योगगक क्षेत्र निर्माण केल्यास त्याचा मोठा फायदा शेतकरी व तरुण बेरोजगार टेक्निकल कुशल अकुशल कामगार स्थानिक उद्योजक यांना होणार आहे. अन्यथा या ज्वलंत मागण्यांचा सकारात्मक विचार न केल्यास दि.१४/१०/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. आंबेडकर चौक ते माजलगाव तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा राष्ट्रीय क्रांती सेनेचच्या वतीने संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे, शेख यावर जिबरान,शेख खाजा, रिहान चोधरी,रवी देशमुख,श्रीराम मुंडे,दत्ता नागरगोजे, सुहास मुंडे, नितीन मुंडे, संतोष नागरगोजे, अण्णा मायकर भागवत मुंडे,यांनी दिला आहे.

---

# पान १वरून...

## सोयाबीनमुळे शेतकऱ्यांचे

दर मिळणे गरजेचा आहे. मात्र मागील दोन वर्षापासून सोयाबीनने ५००० रुपयांचा पण टप्पा गाठला नाही. दुसरीकडे सोयाबीनच्या बियाण्याचे, खताचे आणि कीटकनाशकांचे दर प्रचंड वाढले आहेत. त्या उलट सोयाबीनच्या उत्पादनात मात्र गेल्या काही वर्षात मोठी घट झाल्याचे दिसून येत आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, पिवळा मोझ्याक सारख्या बुरशी जन्य रोगाचा वाढलेला प्रादुर्भाव यामुळे सोयाबीनच्या उत्पादनात कमालीची घट झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत एकरी अवघे पाच ते सहा क्विंटल सोयाबीन होतं आहे. आस्मानी, सुलतानी सर्वच संकटात शेतकरी अडकला आहे.

-----------

## राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जन्मगांव

आवाहन भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडेयांनी कार्यकर्त्यांना केलं आहे. पंकजाताई मुंडे यांनी सोशल मीडियात एक व्हिडिओ जारी करून सर्वांना या मेळाव्याला येण्याचे आवाहन करतांना काही सूचना देखील केल्या आहेत. आपल्या कार्यकर्ते व समर्थकांना काळजी घेण्याचे आवाहन करतांना म्हटले आहे, की सावरगावचा दसरा मेळावा ही आपली परंपरा पुढे कायम ठेवण्यासाठी तुम्ही आणि मी देखील उत्सूक आहे. तुम्ही मोठ्या संख्येने येणार आहात याची मला कल्पना आहे. मी तुम्हाला काही सूचना सांगणार आहे. तुम्ही त्या पाळाल याची मला खात्री आहे. मेळाव्याला येतांना घरून आपली भाकरी, चटणीची शिदोरी सोबत घेऊन या. सोबत पाण्याची बाटली, त्यासोबतच साखर, मीठ मिसळून तयार केलेल्या पाण्याची दुसरी बाटली आणि साखर देखील आपल्या सोबत ठेवा. ऊन प्रचंड असणार आहे, त्याच्यापासून बचाव करण्यासाठी गमचा, टोपी, स्कार्फ आणायला विसरू नका. वाहने वेगाने चालवू नका, शांततेने या. सकाळी १० वाजे दरम्यान प्रांगणात बसता येईल यादृष्टीने तयारी ठेवा. वाहनांनी येतांना आपली वाहने योग्यरितीने पार्क करा जेणेकरून येणाऱ्या इतर वाहनांची व नागरिकांची गैरसोय होणार नाही. दसरा मेळावा आपल्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करायचा आहेच, पण त्यासोबतच काळजी देखील घ्यायची आहे, असे आवाहन देखील पंकजाताई मुंडे यांनी केले.

---------------

## डॉ.क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघासाठी

पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून एका वर्षातच २५ कोटींहून अधिकचा निधी आणत बीड मतदारसंघाच्या विकासाचे व्हिजन असल्याचे दाखवून दिले आहे. थेट राज्य शासनाच्या विभागाकडून आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आतापर्यंत बीड विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागासाठी पहिल्या टप्प्यात ३ व दुसऱ्या टप्प्यात २ असा एकूण ५ कोटी रुपयांचा निधी मिळाला. शहरी भाग व प्रमुख गावांसाठी पहिल्या टप्प्यात ६ व दुसऱ्या टप्प्यात ७ असा १४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला. तसेच, मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील विकासासाठी शासनाने भरीव तरतूद केली. या योजनेतून पहिल्या टप्प्यात ३ व दुसऱ्या टप्प्यात ४ असा एकूण ७ कोटी रुपयांचा निधी मिळाला. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून आजतागायत २५ कोटीहून अधिकचा निधी बीड विधानसभा मतदारसंघात आणला. त्यामुळे मतदारसंघातील विकासाची प्रक्रिया गतिमान झाली असून कोट्यवधींची विकासकामे प्रगतीपथावर आहेत. हे सर्व ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांच्यामुळे शक्य झाले असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले.

**आमदारांना जमले नाही ते योगेश क्षीरसागर यांनी करून दाखविले**

बीडच्या स्थानिक आमदाराच्या आमदार फंडाइतका निधी डॉ.योगेशभैयांनी अवघ्या एका वर्षात खेचून आणला. यासोबतच मतदारसंघातील ४० स्मार्ट अंगणवाड्या, ग्रामीण रुग्णालय, पशुवैद्यकीय दवाखाना, सामाजिक सभागृह, सिमेंट रस्ते, नाली, बंधारा, दुरुस्तीची असंख्य सार्वजनिक कामे पूर्णत्वास गेली आहेत. त्यामुळे बीडच्या विकासाचे व्हिजन असलेला नेता म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर यांची प्रतिमा तयार होत आहे.

------------

## टाटा समूहाची धुरा नोएल

निधनाबद्दल दुःख व्यक्त करण्यात आले. यावेळी टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष रतन एन. टाटा यांनी केवळ टाटा समूहासाठीच नव्हे तर देशाच्या उभारणीसाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात आले, असे टाटा ट्रस्टने जारी केलेल्या निवदेनात म्हटले आहे. यावेळी नोएल नवल टाटा यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. नोएल टाटा म्हणाले, माझ्या सहकारी विश्वस्तांनी माझ्यावर सोपवलेल्या जबाबदारीमुळे मी अत्यंत आदर व्यक्त करतो. मी रतन एन. टाटा आणि टाटा समूहाच्या संस्थापकांचा वारसा पुढे नेईन. एका शतकाहून अधिक काळापूर्वी स्थापन झालेले टाटा ट्रस्ट हे सामाजिक हिताचे काम करण्यासाठी एक अद्वितीय माध्यम आहे. या क्षणी, आम्ही आमच्या विकासात्मक आणि परोपकारी उपक्रमांना पुढे नेण्यासाठी आणि देशाच्या उभारणीत आमचे योगदान कायम राहावे, यासाठी मी स्वतःला पुन्हा समर्पित करतो, असे नोएल टाटा यांनी यावेळी म्हटले.

---------

## पालकमंत्री धनंजय मुंडेंचा

बीड जिल्ह्यातील बहुतांश तांड्यांना सम प्रमाणात निधी देण्यात आला आहे. याबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचे आभार मानले आहेत. नुकतेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून २८ हजार घरकुलांसाठी ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यापाठोपाठ जिल्ह्याचे उद्योग भवन, विविध रस्त्यांची दर्जा उन्नती, यासह पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी विविध विकास कामांना निधी खेचून आणण्याचा सध्या धडाका सुरू आहे.

-----------

## आजी,माजी आमदारांनी शेतकरी,

माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले. आष्टा (हरिनारायण) या जिल्हा परिषद गटातील भातोडी, आष्टा (हरिनारायण), आंधळेवादि आणि आष्टी मुर्शदपुर येथील रस्ते कामांच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे छत्तीसगड येथील माजी खासदार आणि ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष चंदुलालजी शाहू उपस्थित होते. ते पुढे म्हणाले, आष्टा (हरिनारायण) जिल्हा परिषद गटातील सर्व गावांमध्ये दर्जेदार रस्त्यांची कामे, पाणीपुरवठा योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत गावो गावी शेततळे, तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना देताना आपण कोणताही भेदभाव केला नाही आजी-माजी आमदारांनी आष्टा (हरिनारायण) परिसरातील गावातील शेतकऱ्यांना योग्य दाबाने आणि पुरेसा वीजपुरवठा करण्यासाठी काही उपाय योजने न केल्यामुळे सध्या या परिसरामध्ये शेतकऱ्यांना सिंचनासाठी अडचणी निर्माण होत आहेत अखेर आपण स्वतः वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून वीज पुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावला आहे. दैनंदिन प्रश्नांसाठी सर्वसामान्य लोकांसाठी आपले दार सतत खुले असल्यामुळे मी विधानसभा सदस्य नव्हतो तरीही परिसरातील जनतेला मी याची उणीव भासू दिली नाही आपले राजकीय विरोधक जनतेचे मनभेद करून पोळी भाजण्याचा प्रयत्न करत आहेत केवळ निवडणुकीच्या काळामध्ये जनतेत मिसळण्याचे काम सुरू असून ठोस विकास कामांचे पुरावे ते देऊ शकत नाहीत त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक आपल्या सर्वांच्या आशीर्वादावर लढवणार असून आष्टा हरिनारायण जिल्हा परिषद गटातील जनता हे माझे कुटुंब आहे. आज आष्टा (हरिनारायण) ते शिंदे वस्ती ३ कोटी ८३ लाख रुपये, भातोडी विविध विकासकामांचे भूमीपूजन ३ कोटी २९ लाख आंधळेवाडी रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन ४ कोटी ८ लाख,मुर्शदपूर खडकत रोड ते माऊली मंदिर रस्ता भूमीपूजन ५ कोटी रुपये पिंपरी रोड भूमीपूजन सिमेंट रस्ता ४ कोटी या विकास कामांचा शुभारंभ करण्यासाठी आलो आहे निवडणूक प्रचार काळात मते मागण्यासाठी आल्यानंतर आणखी सविस्तर भाष्य करणार आहोत असे सांगितले कासारी ग्रामपंचायत माझ्या ताब्यात दिल्यापासून मी या भागाचा बॅक लॉक पहिला भरून काढण्याचे काम केले मुर्शदपुर करांना आता सुंदर रस्ते स्वच्छ पाणी देण्याचे काम आपन केले आहे. यावेळी भारतीय जनता पार्टी च्या वतीने आष्टी विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या मनातील कौल आजमावण्यासाठी निरीक्षक म्हणून आलेले छत्तीसगड येथील माजी खासदार आणि ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष चंदुलाल साहू आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सुरेश धस हे सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाची जाणीव असलेले तडफदार नेतृत्व असून जो नेता कोरोना काळामध्ये आपली जीवाची परवा न करता जनतेचे प्राण वाचवण्यासाठी अहोरात्र झटला अशा लोकाभिमुख विकास भिमुख नेतृत्व आहेत सुरेश धस पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सबका साथ सबका विश्वास सार्थ ठरवण्यासाठी महाराष्ट्रात देखील भारतीय जनता पार्टी मित्र पक्षांचे सरकार पुन्हा यावे आणि आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पार्टीचा आमदार व्हावा त्यासाठी प्रत्येक मतदार आणि प्रत्येक मत महत्त्वाचे असून या मताद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदींना विश्व नेतृत्व करण्याची संधी मिळाली असून हे नेतृत्व आणखी प्रबळ करण्याची आवश्यकता आहे महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, डॉ.आंबेडकर यांच्यासारख्या असामान्य व्यक्तिमत्त्वांची, ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज या संतांची आणि वीर सावरकर, चाफेकर बंधू या क्रांतिकारकांची आहे त्यामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीचे सरकार पुन्हा आणावे यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा आणि परिश्रम करण्याचे आवाहन त्यांनी शेवटी केले. यावेळी जि. प .सदस्य अमर निंबाळकर,सरपंच गणेश माळवे,नगराध्यक्ष जिया बेग,खंडू जाधव, सरपंच अशोक मुळे,माजी सरपंच सचिन लोखंडे,माजी सरपंच अतुल कोठुळे,कपिल अग्रवाल,मनोज धनवडे,सतिष जंगले नितीन खिळे इनु पिनुशेठ धनवडे,बबलू भाई,जितेंद्र शिंदे, अजित मुळे,किशोर झरेकर,शहादेव नरवडे,अभियंता सौदागर,गणेश पोकळे,आशिष अग्रवाल,बंटी धोंडे,बाळासाहेब बोराडे,अविनाश गिरी यांच्यासह मान्यवर,पदाधिकारी, पत्रकार,आष्टा ह.ना.,आंधळेवाडी,भातोडी, मुर्शदपूर, शिदेवाडी,कासारी आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

----------

## दिल्लीतून दोन हजार कोटी रुपयांचे कोकेन जप्त

आले आहे. दुबईत उपस्थित भारतीय नागरिक वीरेंद्र बसोया याचे नाव आंतरराष्ट्रीय सिंडिकेटचा मास्टरमाईंड म्हणून समोर आले आहे. बसोयाला यापूर्वीच भारतात ड्रग्ज प्रकरणात अटक करण्यात आली होती. मात्र जामीन मिळाल्यानंतर तो दुबईला गेला आणि आंतरराष्ट्रीय ड्रग्ज कार्टेलचा मोठा माफिया बनला. ५ हजार कोटी रुपयांच्या ड्रग्ज सिंडिकेटचा मास्टरमाईंड आणि मुख्य आरोपी तुषार गोयल आणि वीरेंद्र बसोया हे जुने मित्र असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

----------------

## राज्य सरकार राबविणार

राबवण्याची घोषणा केली आहे. या योजनेचा उद्देश विद्यार्थ्यांना संविधानाच्या महत्त्वपूर्ण मूल्यांबद्दल जागरूक करणे आणि त्यांचे हक्क व कर्तव्ये समजून देणे आहे. सरकारने जारी केलेल्या शासकीय निर्णयात (जीआर) विद्यार्थ्यांना संविधानातील त्यांच्या मूलभूत हक्क आणि कर्तव्ये समजून घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे महत्त्व सांगितले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि राष्ट्रवादाची भावना वाढवण्याची सरकारला आशा आहे. या महोत्सवाचा एक भाग म्हणून, राज्याने शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहांमध्ये संविधानाची उद्दिष्टे ठळक ठिकाणी लावण्याचे आदेश दिले आहेत. जेणेकरून विद्यार्थी सहजपणे त्याचे वाचन करू शकतील. तसेच, वसतिगृहांमध्ये संविधानाच्या उद्दिष्टांचे दैनंदिन वाचन देखील करण्यात यावे, असे निर्देश दिले आहेत. विद्यार्थ्यांना संविधानाची सखोल समज मिळवून देण्यासाठी शाळांमध्ये ६०-९० मिनिटांची व्याख्याने आयोजित केली जातील, ज्यामध्ये संविधानाच्या निर्मितीची प्रक्रिया, त्यातील विविध विभाग, अधिकार आणि कर्तव्ये याबद्दल माहिती दिली जाईल. शिक्षक विद्यार्थ्यांना संविधानातील तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी मार्गदर्शन करतील. याशिवाय, संविधानाच्या महत्त्वावर विशेष कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित करण्यात येतील. जीआरमध्ये शाळा व महाविद्यालयांनी संविधानाच्या विविध विभागांची माहिती देणारी फलक व पोस्टर्स लावण्याची सूचनाही दिली आहे. रस्त्यावर नाटकांद्वारे संविधानाबद्दल जागरूकता पसरवण्याची शिफारस देखील करण्यात आली आहे. निबंध लेखन, वादविवाद आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन देखील करण्यात यावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बैठका संविधानाच्या उद्देश वाचनाने सुरू करण्याचेही निर्देश दिले आहेत, आणि राज्य विधिमंडळाच्या सत्रांना देखील याच पद्धतीने सुरुवात केली जाईल.

**बारा सदस्यीय समिती स्थापन**

'घर घर संविधान' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली १२ सदस्यीय समिती स्थापन करण्याची शिफारस जीआरमध्ये करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय समिती स्थापन केली जाईल.

--------------

## लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरण्यास

त्या लाडक्या बहिणींना आपले अर्ज भरता येणार आहेत. मात्र, हे अर्ज फक्त अंगणवाडी सेविकांमार्फतच भरण्यात यावेत, अशी सूचना शासनाकडून करण्यात आली आहे. त्यामुळे, लाडक्या बहिणींना आता नव्याने अर्ज करण्याची संधी मिळाली आहे. पुढील ४ दिवसांत अर्ज करुन या योजनेचा लाभ घेता येईल. दरम्यान, राज्यात आत्तापर्यंत २ कोटी ३० लाख बहिणींच्या खात्यात ५ महिन्यांचे हफ्ते सरकारकडून जमा करण्यात आले आहेत. राज्यातील लाडकी बहीण योजनेला मिळणारा उदंड प्रतिसाद पाहून राज्य सरकारकडून या योजनेला मुदतवाढ दिली जात आहे. यापूर्वी ३० सप्टेंबरपर्यंत ह्या योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार, गेल्या महिन्यातही लाखो महिलांना आपले अर्ज सादर केले आहेत. ज्या महिलांनी अर्ज सादर केले, त्यांना या योजनेचा लाभही मिळण्यास सुरुवात झाली आहे. रक्षाबंधन सणाचा मुहूर्त साधत राज्य सरकारने या योजनेच्या पहिल्या हफ्त्याच्या वितरणास सुरुवात केली होती. तेव्हापासून आजपर्यंत तब्बल २ कोटी ३० लाख महिला या योजनेत पात्र ठरल्या असून, त्यांच्या बँक खात्यावर पैसेही जमा होण्यास सुरुवात झाली आहे. बहुतांश महिलांच्या बँक खात्यात तब्बल ५ हफ्ते म्हणजे ७५०० रुपये जमा झाले आहेत. आता, उर्वरीत महिलांनाही लाडकी बहीण योजनेसाठी १५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरता येणार आहे. मात्र, त्यासाठी केवळ अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून अर्ज करता येईल.

----------

## मनोज जरांगे पाटील

आहेत, भाविकांनी मोठ्या संख्येने या मेळाव्यास उपस्थित रहावे असे आवाहन महंत शिवाजी महाराज यांनी केले आहे. श्री क्षेत्र नारायण गड हे राज्यातील कोट्यवधी भाविकांचे धाकटी पंढरी म्हणून श्रद्धास्थान आहे, नारायण गड येथे सेवेचे फळही नगद मिळते, शिवाय राज्यतील वारकरी संप्रदायाचे उर्जास्थानही श्री क्षेत्र नारायण गड आहे. त्यामुळे येथे पारंपरिक होणार्या दसरा मेळाव्यालाही एक अधिष्ठाण आहे. यावर्षी नारायण गड येथे होणार्या मेळाव्यात मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून ते मार्गदर्शन करणार आहेत, त्यामुळे या दसरा मेळाव्याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. यावर्षीच्या दसरा मेळाव्यास पूर्ण महाराष्ट्र राज्य व कर्नाटक सिमावर्तीभागातीलही भाविक उपस्थित राहणार आहेत. श्री क्षेत्र नारायण गड येथे येणार्या भाविकांची कुठलीही गैरसोय होऊ नये यासाठी नारायण गडचे हजारो भाविक गेल्या पंधरा दिवसांपासून रात्रंदिवस परिश्रम घेत कार्यरत आहेत. नारायणगड येथे भाविकांच्या श्रमदानातून दोनशे एकरवर मेळाव्यासाठी मैदान तयार करण्यात आले आहे. गडाच्या चारही बाजुने येणार्या वाहनांसाठी पाचशे एकरवर पार्किंगची सोय करण्यात आली आहे. गडावर येणाऱ्या कोट्यवधी भाविकांसाठी बसण्याची सोय, महाप्रसाद, नाष्टा, पिण्यासाठी पाणी बॉटल, वैद्यकीय सुविधा अशी सर्व व्यवस्था श्री क्षेत्र संस्थान नारायण गडने केली असल्याचेही महंत शिवाजी महाराज यांनी सांगितले. या दसरा मेळाव्यासाठी मुंबई, पुणे, कोल्हापूर, कोकण, नागपूर, छत्रपती संभाजीनगरसज्ह संपूर्ण विदर्भ, खांदेश या विभागातूनही लाखो भाविकांचा ओघ नारायणगड येथे सुरू असून शुक्रवारी रात्रीच गडावर लाखो भाविक दाखल झाल्याचेही दिसून आले.

**हाजारों स्वयंसेवक करणार येणाऱ्या भाविकांची सेवा**

काल पासूनच श्रीक्षेत्र नारायणगडकडे राज्य भरातून येणाऱ्या भाविकांचा ओघ वाढत चालल असून सायंकाळी मोठ्या प्रमाणावर गडावर गर्दी झाल्याचे दिसून आले,पाहटे पासूनच वाहनांची गर्दीच गर्दी दिसून येते होती,या येणाऱ्या वाहनांमधील भाविकांची गडाच्या परिसरातील चोहोबाजूंच्या असंख्य गावांमध्ये पाणी व नाष्टाची सोय करण्यात आली आहे.

**तगडा पोलिस बंदोबस्त**

एक अतिरिक्त पोलिस अधीक्षक, दोन उपअधिक्षक, चार पोलिस निरीक्षक, अठ्ठावीस पोलिस उपनिरीक्षक, एकशे चोंसठ्ठ पुरुष पोलिस कर्मचारी, सोळा महिला कर्मचारी,सतरा वाहतूक कर्मचारी, पंचेचाळीस वाकी टाकी, सोळा वाहने, दोन दंगल नियंत्रण पथक, घातपात पथक, वायरलेस पथक दहा, यासह बीड शिरूर कासार,चकलंबा, गेवराई, माजलगावसह जिल्हा भरातील दोनशे ब्याएंशी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**वैद्यकीय सेवेसाठी २५ पथक**

दसरा मेळाव्यासाठी कोट्यवधी भाविक नारायणगडावर येणार असल्यामुळे त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी २५ वैद्यकीय कक्ष स्थापन करण्यात आले असून वैद्यकीय सेवा देणार आहेत.

**३०० गावात चहा पाणी नाष्ट्याची व्यवस्था**

श्रीक्षेत्र नारायणगड परिसरातील जवळपास तिनशे पेक्षाही अधिक गावात येणाऱ्या भाविकांची चहा, पाणी, नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली असून भाविकांना श्री क्षेत्र नारायणगड परिसरात अडचण येऊ नये म्हणून परिसरातील गावांमध्ये जय्यत तयारी करण्यात आली आहे.

## जिजाऊ ब्रिगेडच्या पाटोदा तालुका अध्यक्षपदी संध्याताई टेकाळे



बीड । प्रतिनिधी

जिजाऊ ब्रिगेडच्या पाटोदा तालुका अध्यक्षपदी संध्याताई टेकाळे तर शहराध्यक्षपदी सुवर्णाताई ढाले यांची नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णाताई गिरे यांनी केली. जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णाताई गिरे यांनी यासंदर्भात नियुक्ती पत्रात म्हटले आहे की आपण सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल तसेच संघटनेबद्दल असलेली आत्मीयता, समाज परिवर्तना बद्दलची तळमळ, संघटनात्मक कौशल्य ,निर्णय क्षमता, संघटनेसाठी तन मन धनाने काम करण्याची दाखवलेली तयारी, महिलांचे संघटन करून महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आपली असलेली धडपड या सर्व बाबी लक्षात घेऊन मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य व जिल्हा कार्यकारिणीने नियुक्ती केली असल्याचे सुवर्णाताई गिर्हे यांनी म्हटले आहे. यावेळी नियुक्तीपत्र देताना जिल्हा अध्यक्ष सुवर्णाताई गिरे ,सीमाताई बोके, वर्षाताई माने, वैशालीताई कडू याबरोबरच जिजाऊ ब्रिगेड, मराठा सेवा संघ ,संभाजी ब्रिगेड सर्व पदाधिकारी उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी संध्याताई टेकाळे ,सुवर्णाताई ढाले यांचे अभिनंदन केले.

# परळी मतदारसंघातून राजेसाहेब देशमुख यांच्यासह १४ जणांनी दिल्या मुलाखती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडे सक्षम उमेदवार असल्याचे दिसून आले. जिल्ह्यात विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी इच्छुक असणारांच्या मुलाखती गुरूवार, दिनांक १० ऑक्टोबर रोजी दिवसभर काँग्रेस भवन, अंबाजोगाई येथे घेण्यात आल्या. यात परळी मतदारसंघातून स्वतः जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्यासह जिल्हाभरातून १४ सक्षम व इच्छुक उमेदवारांनी मुलाखती दिल्या. अतिशय शांततेत मुलाखत प्रक्रिया पार पडली.

काँग्रेस तर्फे नेमण्यात आलेले पक्ष निरीक्षक तथा माजी आमदार ॲड.रामहरी रूपनवर यांनी या मुलाखती घेतल्या. त्यांच्या समवेत जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष ईश्वर शिंदे व शहराध्यक्ष असिफोद्दीन खतीब हेही उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघांसाठी या मुलाखती झाल्या. बीड पासून सुरूवात झाली. डॉ.दिलीप मोटे, सहदेव हिंदोळे असे दोन जण बीड मधून इच्छुक आहेत. तर परळीमधून स्वतः जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, वसंतराव मुंडे, ॲड.अनिल मुंडे हे इच्छुक आहेत. केजमधून ॲड.अनंतराव जगतकर, रविंद्र दळवी, नितीन हत्तीअंबिरे, राहुल वाव्हळे, दत्ता कांबळे, ॲड.मारूती सावळकर असे सहा जण इच्छुक आहेत. तसेच आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातून छगन खटके पाटील, रविंद्र ढोबळे हे दोघे जण इच्छुक आहेत. गेवराई मतदारसंघातून मनोहर चाळक हे इच्छुक आहेत. माजलगाव मतदारसंघासाठी कोणी मुलाखतीसाठी उपस्थित नव्हते. बीड जिल्ह्यातील बीड, परळी, केज, गेवराई व आष्टी - पाटोदा - शिरूर मतदारसंघातून एकूण १४ जणांनी काँग्रेस पक्षाकडून विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी उमेदवारी मागितली आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना पक्ष निरीक्षक तथा माजी आमदार ॲड.रामहरी रूपनवर यांनी सांगितले की, राष्ट्रीय नेते खासदार राहुलजी गांधी यांच्या



भारत जोडो पदयात्रेमुळे देशातील वातावरण बदलले आहे. तरूणांमध्ये नवचैतन्य व उत्साह संचारला आहे. लाट निर्माण झाली आहे. काँग्रेस पुन्हा सत्तेवर आली पाहिजे, काँग्रेस शिवाय देशाला पर्याय नाही. अशी भावना समाजात निर्माण झाली आहे. आणि त्यामुळेच महाराष्ट्र प्रत्येक जिल्ह्यात काँग्रेसने निवडणूक लढविली पाहिजे, उमेदवार उभे केले पाहिजेत असा काँग्रेस पक्ष नेतृत्वाचा मानस, पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मागणी आहे. म्हणून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रदेश काँग्रेस कमिटीने बीड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवले होते, ते अर्ज प्रदेश कार्यालयाकडे आल्यानंतर बीड जिल्ह्यात इच्छुक उमेदवारांची विधानसभानिहाय यादी पाठविण्यात आली. या सर्व इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींचा कार्यक्रम गुरूवार, दिनांक १० ऑक्टोबर रोजी घेण्यात आल्या.

### काँग्रेसकडे बीड जिल्ह्यात सक्षम उमेदवार ; महाविकास आघाडीत काँग्रेस मागणार बीड, परळी व केज या जागा - काँग्रेस पक्ष निरीक्षक तथा माजी आमदार ॲड.रामहरी रूपनवर यांची माहिती

महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या निर्देशानुसार आणि प्रांताध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांच्या मान्यतेने बीड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीसाठी माझी निरीक्षक म्हणून नियुक्ती केली होती. मी गुरूवारी दिवसभर १४ जणांच्या वन-बाय-वन मुलाखती घेतल्या. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. काँग्रेसकडून लढणाऱ्या इच्छुकांची मोठी संख्या आहे. मुलाखतींना मिळालेला प्रतिसाद चांगला व सकारात्मक होता. मुलाखतींबाबतचा गोपनीय अहवाल ११ ऑक्टोबर पर्यंत प्रदेश कार्यालयाकडे सादर करण्यात येणार आहे, असे सांगून बीड हा पुर्वीपासून काँग्रेस विचारांचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात काँग्रेस मजबूत आहे. महाविकास आघाडीकडे आम्ही बीड, परळी व केज जागांची मागणी लावून धरणार आहोत. या तीन ही मतदारसंघात अतिशय सक्षम व निवडून येण्याची क्षमता असलेले उमेदवार आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने आघाडी धर्म पाळत महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षाचे इमानेइतबारे काम केले. उमेदवार निवडून आणला. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत बीड, परळी व केज या मतदारसंघात काँग्रेसचा बुथनिहाय मतदानाचा परफॉर्मन्स चांगला आहे. ग्राऊंड लेवलवर जावून आम्ही माहिती संकलित केली आहे. बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाकडे संघटनकौशल्य असलेला अध्यक्ष, मजबूत टीम, संघटनात्मक बांधणी, सक्षम व निवडून येण्याची क्षमता, उमेदवारांना निवडून आणण्यासाठीची मतदान प्रणाली, तयारी व साधनसामुग्री असलेले सक्षम उमेदवार आहेत. महाविकास आघाडी व काँग्रेससाठी बीड जिल्ह्यात अतिशय चांगले वातावरण आहे. म्हणून मी पक्ष निरीक्षक म्हणून बीड जिल्ह्याचा चांगला अहवाल प्रदेश कार्यालयाकडे सादर करणार आहे. अशी माहिती पक्ष निरीक्षक ॲड.रूपनवर यांनी दिली. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष नवनाथराव थोटे, युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस शंभुराजे देशमुख, संजय काळे, अशोक देशमुख, शेख मुख्तार (बागवान), बाळासाहेब जगताप, रोहिदास निर्मळ, अक्षय देशमुख, समदभाई कुरेशी, किरण उबाळे आदींसह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

विधानसभेसाठी काँग्रेसकडे सक्षम उमेदवार :

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीकडे सहा विधानसभा मतदारसंघात जे-जे इच्छुक उमेदवार होते. त्या सर्वांच्या मुलाखती घेण्यासाठी ॲड.रूपनवर साहेब यांनी पक्ष निरीक्षक म्हणून गुरूवार, दिनांक १० ऑक्टोबर रोजी सकाळ पासून मुलाखती घेतल्या आहेत. बीड जिल्हा काँग्रेसकडे १४ उमेदवारांनी निवडणूक लढविण्यासंदर्भात ते इच्छुक असलेल्याचे सांगत आपला कार्य अहवाल सादर केला. आपण आपल्या मतदारसंघात कसे सक्षम आहोत. हे त्यांनी दाखवून दिले आहे. एकूणच बीड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाकडे निवडून येण्याची क्षमता असलेले सक्षम उमेदवार आहेत. राष्ट्रीय नेत्या खासदार सौ.रजनीताई पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या नेतृत्वात आम्ही पक्षाकडे बीड, केज व परळी विधानसभा मतदारसंघ मागितले आहेत.

- राजेसाहेब देशमुख
(अध्यक्ष, बीड जिल्हा काँग्रेस कमिटी.)

## उद्योजक रतन टाटा यांच्या निधनाने उद्योग जगतातला विश्वास हरवला- माजलगावकरांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली

माजलगाव । प्रतिनिधी

उद्योग जगतातील विश्वसनीय नाव म्हणजे रतन टाटा.रतन टाटांनी आपल्या उद्योग साम्राज्याचा विस्तार केला तो केवळ प्रामाणिकपणा,विश्वास व सचोटी या त्रिसूत्रीवर.रतन टाटा गेले म्हणजे विश्वास संपला.अशा दु:ख पूर्ण भावना माजलगावकरांच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दि ११ ऑक्टोबर शुक्रवार रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास व्यापारी महासंघ व माजलगावकरांच्या वतीने कै.रतन टाटा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या दु:खद भावना व्यक्त केल्या.यावेळी जेष्ठ नेते माजी आमदार मोहनराव सोळंके,माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील,आ. प्रकाश सोळंके,गोविंद बजाज,सुरेंद्र रेदासनी,जगदीश चांडक,उमेश मोगरेकर,तुकाराम




येवले,बबनराव सरवदे,अच्युतराव लाटे,सतीश दुगड,श्रीहरी मोरे,ऑड.बी.एल. डक,अरुण राऊत,नासेर खान, गणेश भंडारी,माधव निर्मळ,अशोक वाडेकर,ईश्वर खुरपे,कल्याण सेफ,दत्ता महाजन,विनायक रत्नपारखी,जफर मिर्झा गणेश लोहिया,नारायण सातपुते,विलास नेमाने,शरद भांडेकर,बबनराव सरवदे, लक्ष्मीनारायण मुंदडा,महावीर मस्के,पद्माकर कांबळे,इत्यादी मान्यवरांनी आपल्या शोकाकुल भावना व्यक्त केल्या.

या कार्यक्रमातचे सुत्रसंचालन व आभार नंदकुमार आनंदगावकर यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुनिल भांडेकर,कैलास येलशेटे,मनोहर घुले,,संजय कोकड,रमेश चांडक, शेख मस्जिद,रियाज काजी,शेख सल्लाउदीन,गणेश जाधव,निलेश सोळंके, मुर्तुज शेख,विवेक बजाज, मुर्तुज शेख,बंडु इके,कपिल पगारीया यांनी केले.माजलगावातील सर्व स्तरातुन व्यापारी बांधवांची उपस्थिती होती.

## हंबर्डे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची मतदान जनजागृती

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात आज गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती, तहसील कार्यालय , व अॅड बी. डी .हंबर्डे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमानाने आष्टी शहरातील प्रत्येक भागामध्ये बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले व बाईक रॅली काढून मतदानाचे व्हिडिओ दाखवणारे व्हॅन फिरवून मतदान जनजागृती करण्यात आली. यामध्ये आष्टी तहसीलच्या तहसीलदार सन्माननीय वैशाली पाटील व तहसील कार्यालयातील सर्व कर्मचारी तसेच पंचायत समिती कार्यालयातील गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव व कार्यालयातील सर्व कर्मचारी गुंड सर,दिंडे सर विस्ताराधिकारी गटशिक्षणाधिकारी कार्यालय आष्टी तसेच अॅड बी डी हंबर्डे महाविद्यालयातील प्राचार्य डॉ निंबोरे सर अध्यक्ष किशोर हंबर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ महेंद्र वैरागे तसेच प्रा रवींद्र डोंगरे हे उपस्थित होते. तसेच पारगाव जोगेश्वरी येथे अॅड बि डी हंबर्डे महाविद्यालय व गटशिक्षणाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती चे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये पारगाव जोगेश्वरी या ठिकाणी जोगेश्वरी देवीच्या यात्रेनिमित्त आलेल्या भाविकांची मतदान जनजागृती करण्यात आली. उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम ,राष्ट्रीय सेवा योजना विभाग, यांचा सहभाग नोंदवण्यात आला अशा रीतीने एकंदरीत मतदान जनजागृतीचे कार्यक्रम दिवसभरात पार पडले.

## पान १वरून...

### पक्षाने संधी दिल्यास

उभारणी केली. हा कारखाना अखंडपणे सुरू रहावा, शेतकऱ्यांचे हित साधले जावे म्हणून हा कारखाना हस्तांतरित केला. आगामी परळी विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी आपण इच्छूक आहोत, इतर इच्छुक उमेदवारांबरोबरच आपलीही पक्षाने दखल घेवून मुलाखतीसाठी आपल्याला मुंबईत पक्ष कार्यालयात बोलावून घेतले होते. या निवडणुकीसाठी आपण इच्छूक असून पक्षाने संधी दिल्यास आपण ही निवडणूक लढवण्यास तयार आहोत असे श्री अभिजीत देशमुख यांनी यावेळी सांगितले.दरम्यान, परळी विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. शरदचंद्र पवार साहेब, आमदार रोहितदादा पवार, मा.ना. श्री. बजरंग बप्पा सोनवणे मा. श्री. मेहबूब शेख युवक अध्यक्ष राष्ट्रवादि प्रदेश काँग्रेस शरतचंद्र पवार. यांच्यासोबत आपली चर्चाही झाली असल्याचे अभिजीत देशमुख यांनी सांगितले. परळी-तील व परळी मतदार संघातील सामाजिक, राजकीय विषयावर मा. शरदचंद्र पवार साहेब व रोहितदादा पवार यांनी आपल्याबरोबर चर्चा केल्याचे श्री देशमुख म्हणाले. येणाऱ्या काळात मला जे काही शक्य होईल तेवढे काम मी परळी वैजनाथ मतदार संघातील माझ्या मायबाप जनते साठी करेल. असे देशमुख म्हणाले.

### शासकीय योजनेतील लाभार्थ्यांची

गांधी निराधार, इंदिरा गांधी भुमिहिन शेतमजुर व श्रावणबाळ योजनेतील लोकांना ६ हजार रूपये महिना पगार करावा, ३) संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी भुमिहीन शेतमजूर व श्रावणबाळ योजनेच्या लोकांचा दर महिन्याला पगार करावा, ४) इंदिरा गांधी शेतमजुर भुमिहीन शेतमजुर व श्रावण बाळ योजनेच्या लोकांचे वय ६६ वर्षांवरून ५० वर्षे करावे, ५) डीआरडी उत्पन्नाची मर्यादा वाढवून त्याचे वार्षिक उत्पन्न ७५ हजार इतके करावे, ६) दिव्यांगांना शासनाने बँक कर्जावर ५० टक्के सबसीडी द्यावी, ७ ) १२ बलुतेदार लोकांना विश्वकर्मा प्रधानमंत्री योजनेची अमंलबजावणी करावी आणि ८) पंतप्रधान घरकुल योजना, इंदिरा आवास घरकुल योजना, रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, मोदी आवास घरकुल योजना या घरकुल योजनांची १ लाख ३८ हजारावरून मर्यादा वाढवून २ लाख ५० हजार करावे या मागण्या मान्य कराव्यात. असे नमूद केले आहे. निवेदनाच्या प्रतिलिपी १) शहर पोलीस स्टेशन व २) तहसिलदार, अंबाजोगाई यांना देण्यात आलेल्या आहेत. सदरील निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे, जिल्हा उपाध्यक्ष, परमेश्वर मिसाळ, जिल्हा सचिव नारायणराव मुळे, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष केशव टेहरे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अश्विनी यादव, तालुकाध्यक्ष सुनंदा लोखंडे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष सिद्राम यादव, विद्यार्थी आघाडीचे तालुकाध्यक्ष सतिश कुंडगर, ॲड.माधव जाधव, ॲड.पी.जी.शिंदे, दत्तू सरवदे, इराप्पा सरवदे, अनंत फेटे, बळीराम शेळके, शरद भांडवलकर, सुरेश लोखंडे, रामराव पाडुळे, महेश सातपुते, अण्णासाहेब देशमुख, हरिबाई माचवे, बालिकाबाई वेदपाठक, विजाबाई सरवदे, गंगाबाई मुळे, मैनाबाई साखरे, उषा सरवदे, गंगाबाई सरवदे, प्रभावती कदम, अनुसया पाडुळे, वनारसीबाई पाडुळे, द्रौपदी सरवदे, शेषाबाई सरवदे, ईराप्पा पाडुळे, ॲड.डी.आर.गोरे, ॲड.पी.आर.कासारे, दैवशाला वाघमारे, दोडीराम साखरे, रामभाऊ बुरशे, अनुसया लोखंडे, राजश्री लोखंडे, सुधाकर पन्हाळे, बाबु वलीखाँ पठाण, खाजा चांदसाब शेख, अशोक पालके, आशा जोगदंड, सुनिता पाडुळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. संभाजी ब्रिगेडच्या एक दिवसीय लाक्षणिक उपोषणात शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, श्रमजीवी, कामगार, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### आझाद क्रांती सेनेच्या वडवणी

आवचर, भालेराव मित्र मंडळाचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब साळवे, लक्ष्मण आवाड, उसतोड कामगार सनेचे ता प्रमुख सतीश हाणवते,धारुर ता प्रमुख बळीराम मस्के,उद्योजक केरबा कसबे, लक्ष्मण पाटोळे,आकाश हातागळे,वामण निवे, श्रीराम हाणवते, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ तांबडे,धारुर उपाध्यक्ष चंद्रसेन मस्के,कैलास गायकवाड़ राहूल गायकवाड़,पांडूदादा नानवर,करण मस्के, बाबासाहेब पाटोळे, यांच्या सह तालुक्यातील चाहत्यांनी महादेव आवाड यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

अध्यक्ष पदाला गालबोट लागु देणार नाही

आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांनी माझ्यावर वडवणी ता प्रमुख पदाची जी जबाबदारी सोपवण्यात आली त्या पदाला गालबोट लागु देणार नाही आशी ग्वाही नवनिर्वाचित अध्यक्ष महादेव आवाड यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली.

### आ.कैलास गोरंट्याल

इमारतीचे बांधकाम तात्काळ पूर्ण करून लोकांची विशेषतः रुग्णांची होणारी गैरसोय दूर करावी अशी अपेक्षा आ. कैलास गोरंटयाल यांनी आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्याकडे व्यक्त केल्यानंतर त्यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आयुक्तांना आवश्यक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या सहसचिव डॉ. सुनीता गोल्हाईत यांनी छत्रपती संभाजीनगर येथील आरोग्य विभागाचे उपसंचालक आणि जालना येथील जिल्हा शल्य चिकित्सकांना रामनगर येथील ग्रामीण रुग्णालय इमारत बांधकाम पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

### डॉ.अंजलीताई घाडगे

काँग्रेस व शरदचंद्र पवार यांच्या विचारांच्या उमेदवाराचा बालेकिल्ला राहीलेला आहे. १९९५ नंतर भाजपाला मतदानरूपाने कायम साथ देणारी अनेक गावे केजमध्ये तयार झाली. परंतु, डॉ.अंजलीताईंना मिळणाऱ्या भरभरून प्रतिसादावरून भाजपाचे पारंपरिक मतदार असलेल्या या पट्ट्यात सध्या बदलाची हवा दिसून येत आहे एवढे मात्र नक्की.

### सरपंच अजय शिंदेसह

निवडणुकीत परिसरातून जयसिंग सोळंके यांचा पाठीशी मोठे मताधिक्य उभे करू असे सरपंच अजय शिंदे यांनी प्रास्ताविकात सांगितले. दरम्यान यावेळी बोलताना जयसिंग सोळंके म्हणाले की, कोणत्याही कार्यकर्त्याने राजकीय दबावाला बळी पडू नये. कार्यकर्त्यांच्या रक्षणासाठी छातीचा कोट करू असे सांगीतले. यावेळी हरिभाऊ शिंदे, अशोक कटारे(मा,सरपंच वाघोरा).बंडू चव्हाण(ग्रा,सदस्य) जनार्धन खंडागळे( ग्रा,सदस्य) मोहन गोरे. सोपान गोरे, रफिक शेख, असिफ कुरेशी यांचेसह अनेक युवक कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. दरम्यान अजय शिंदे यांच्या प्रवेशाने ओबीसी समाज जयसिंग सोळंके यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहील

## सोनपेठच्या 'त्या' नराधमास फाशीची शिक्षा देण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचे सत्र थांबता थांबत नसल्याचे चित्र तर आहेच परंतु यामध्ये चिमुकल्या मुलींसुद्धा वेगळ्या दिसून येत नाहीत.बदलापूर येथील चिमुकलीवरील लैगिक अत्याचाराच्या घटनेने राज्यसह देश हादरला असताना परभणीच्या सोनपेठ शहरातून अशीच एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. ऐका राजकीय वरद हस्त असलेल्याइंग्रजी शाळेत शिकणाऱ्या पाच वर्षीय चिमुकलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना ५ ऑक्टोबर रोजी घडली.या घटनेविषयी बीड जिल्हा कहार समाजाच्या वतीने मा. जिल्हाधिकारी बीड व मा.




पोलीस अधीक्षक यांना निवेदन देऊन आरोपीस तात्काळ अटक करून या नराधमांस फाशीची शिक्षा देण्यात यावी असे निवेदनात नमूद करून या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे.


सोनपेठ पोलीस आरोपीस अटक करण्यास टाळाटाळ करत असून सदरील आरोपीस अटक झाली नाही तर सोमवारी परभणी येथे मोठे आंदोलन कहार भोई समाज करणार आहे.असा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.सदर घटनेतील नराधमास तत्काळ अटक करण्यात यावी, हे प्रकरण जलदगतीन्यायालयात चालवून आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी,अशा मागण्या निवेदनाद्वारे सरकारकडे करण्यात आल्या. आरोपीवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा यावेळी कहार समाजाच्या वतीने देण्यात आला. यावेळी श्री. किशन ता तांगडे, सुंदर चव्हाण, फुलचंद लुचारे, भीमा गहिरे,मनोज लुचारे, बाळू लुचारे, अशोक लुचारे, मनोज पाबळे,दत्ता गुणवंत, सतीश लुचारे,परमेश्वर पंचलोटे व इतर कहार समाज बांधव, नागरिकमोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्यांनी दोनशे बासष्ट शस्त्र परवान्याचे अर्ज फेटाळले -ॲड. देशमुख

बीड । प्रतिनिधी

शस्त्र परवाना वैयक्तीक संरक्षणासाठी दिला जातो. तो नियम आहे. मात्र खरी गरज असेल तरच तो द्यावा, हाही नियम आहे. पोलिस अधीक्षक, बीड यांनी शिफारस केल्यानंतर देखील जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दोनशे बासष्ट शस्त्र परवाना मागणारे अर्ज प्रलंबित न ठेवता चक्क फेटाळून निकाली काढले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांची ही कारवाई स्वागतार्ह असल्याचे जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी म्हंटले आहे.

एकीकडे पाठक यांनी ही कामगिरी केली आहे. तर दुसरीकडे तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे



यांच्या कालावधीत माजी सैनिक यांचे सोळा शस्त्र परवान्यांच्या नवीन नोंदी घेतल्या गेल्या. तर अर्जदार यांना निर्गमीत शस्त्र परवान्याची संख्या छत्तीस इतकी आहे. माहिती अधिकारातून ही माहिती उघड झाली आहे.

अपात्र आणि ज्यांच्यावर गुन्हेगारीचे आरोप आहेत, त्यांना सरकार आणि प्रशासनाच्या कृपेने शस्त्र परवाने दिले गेले. हे जनतेला पटत नव्हते. शिवाय शस्त्र लागते कशाला ? हाही प्रश्न आहे. त्यामुळे अविनाश पाठक यांची कारवाई चांगली आहे. अनेक ठिकाणी शस्त्राचा वापर हा दबावसाठी केला जातो. त्यातून दहशत माजविली जाते. गुंडगिरी यातून वाढत असल्याचे जनतेचे मत आहे. तर ज्यांचे काम चांगले असते, त्यांना स्व-संरक्षण भितीचे कधीच वाटत नाही. आता जिह्यात तिस ते चाळीस शस्त्र परवाने मागणारे अर्ज आहेत. तेही जिल्हाधिकाऱ्यांनी फेटाळून लावावेत, असेही अँड. अजित देशमुख यांनी म्हंटले आहे.

## अंबाजोगाईच्या दत्ता लांब यांनी पतंजलि हरिद्वार येथील योग शिबिरात साडेपाच मिनिटांत केली ८४ आसने

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माजी सैनिक दत्ता लांब यांनी नुकतेच पतंजलि हरिद्वार येथील योग शिबिरात केवळ साडेपाच मिनिटांत केली ८४ आसने करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या योग शिबिराचे लाईव्ह प्रसारण जगभर करण्यात आले. मागील काही महिन्यांत तब्बल १११ नि:शुल्क शिबिरातून लांब यांनी हजारो विद्यार्थ्यांना योगाचे मोफत धडे दिले आहेत. भारतीय सैन्यात २१ वर्षे सेवा करून नि:शुल्क शिबिरातून योगाचा प्रचार व प्रसार करणाऱ्या माजी सैनिक दत्ता लांब यांच्या कार्याची दखल घेऊन योगगुरू रामदेव बाबा, आचार्य बालकृष्ण व केंद्रीय प्रभारी, भारत स्वाभिमान यांनी कौतुक करून आशिर्वाद दिले.

माजी सैनिक योग प्रशिक्षक दत्ता सदाशिव लांब यांनी अंबाजोगाई शहर व तालुक्यातील विविध शाळा तसेच महाविद्यालयातून आयोजित करण्यात आलेल्या १११ शिबिरांतून योगाचे मोफत धडे देण्याचे अनमोल कार्य केले आहे. अंबाजोगाई येथील पतंजलि योग समितीचे मुख्य योग प्रशिक्षक, माजी सैनिक, आयुर्वेदिक चिकित्सक दत्ता लांब यांच्या योग दिंडी आपल्या दारी या






योगगुरू रामदेव बाबा आणि आचार्य बालकृष्ण यांनी केले कौतुक

अभियानाची नोंद व आपण केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची माहिती व प्राप्त विविध संस्थांची प्रशस्तीपत्र लांब यांनी पतंजलि योगपीठ हरिद्वार, भारत स्वाभिमान न्यास येथे जमा केली. लांब यांनी केवळ साडेपाच मिनिटांत केली ८४ आसने करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. पतंजलि योगपीठ हरिद्वार येथील शिबिराचे सुप्रसिद्ध आस्था चॅनेल वरून संपूर्ण जगभरात लाईव्ह प्रसारण करण्यात आले. याचा लाभ जगभरातील योग अभ्यासकांनी घेतला. माजी सैनिक लांब यांच्या कार्याची दखल घेऊन योगगुरू रामदेव बाबा, आचार्य बालकृष्ण व केंद्रीय प्रभारी, भारत स्वाभिमान यांनी कौतुक करून त्यांचा यथोचित सन्मान ही केला. लांब यांच्या नि:शुल्क, निस्वार्थ योगसेवेचे उपस्थित सर्वांनीच स्वागत केले. लांब हे भारतीय सैन्यात फिजीकल शिक्षक म्हणून कार्यरत होते. म्हणून त्यांच्या अनुभवाचा आणि मौलिक मार्गदर्शनाचा फायदा विद्यार्थ्यांसह समाजासाठी लाभदायक ठरत आहे. दैनंदिन जीवनात योगाचे काय महत्त्व आहे. ते नि:शुल्क शिकविण्याचे काम लांब हे करीत आहेत. अंबाजोगाई शहर व तालुक्यातील अनेक शाळा व महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांसाठी १५,८,५,३,२ व १ दिवसीय अशा एकूण १११ योग प्रशिक्षण शिबीरे घेवून यात तब्बल ६५ हजारांहून अधिक विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना दिनचर्या, आहार, योगिक डि.बिन्द्रिक, प्राणायाम, सर्व प्रकारचे आसन, योगनिद्रा, ध्यान यांचा अभ्यास व योगाचे धडे देण्याचे मौलिक काम माजी सैनिक लांब हे करीत आहेत. भारतीय सैन्य दलात असताना देखील लांब यांनी दरमहा आपली आर्धी पगार ही गोर-गरीबांसाठी खर्च केलेली आहे. सैन्यात देशसेवा करून निवृत्ती नंतर मागील १२ महिन्यांहून अधिक काळ ते आपली आर्धी पेंन्शन देखील सामाजिक उपक्रमांसाठी खर्च करीत आहेत. ही खरच प्रेरणादायी व कौतुकास्पद बाब आहे. माजी सैनिक लांब हे योगाच्या माध्यमातून समाजसेवा करीत आहेत. अंबाजोगाई शहर व परिसरातील युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक यांना नि:शुल्क, मोफत योग सेवा देवून त्यांचे स्वास्थ निरोगी राहण्यासाठी ते आहोरात्र प्रयत्नशील आहेत. माजी सैनिक योग प्रशिक्षक लांब यांनी योग क्षेत्रात अंबाजोगाईसह बीड जिल्ह्याचे नांव जगात उंचावले आहे.

# केरळ किनारपट्टीवर कमी दाबाचं क्षेत्र

## पुढील ३ दिवस राज्यात कोसळणार जोरदार पाऊस

सध्या राज्याच्या विविध भागात जोरदार परतीचा पाऊस कोसळत आहे. मुंबईसह ठाणे, रायगड या भागात पावसाचा जोर वाढला आहे. दरम्यान, ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील तीन दिवस म्हणजे १३ ऑक्टोबरपर्यंत मुंबईसह संपूर्ण कोकणात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

केरळ किनारपट्टीवरील कमी दाब क्षेत्र सध्या लक्षद्विप वरून अरबी समुद्राच्या मध्यावर पोहोचत आहे. परिणामी आजपासून भाग बदलत राज्याच्या विविध भागात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता जाणवत असल्याचे खुळे म्हणाले. १४ ऑक्टोबरपासून काही दिवसासाठी काहीशी उघडीप जाणवेल. शेतपिके व फळबागांना या पावसापासून कदाचित काहीसा अपाय होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. परंतु ऑक्टोबर महिन्यातील दुसऱ्या आवर्तनातील पावसापासून म्हणजे मंगळवार २२ ऑक्टोबरनंतर होणाऱ्या पावसाचा कोकणातील शेतपिके व फळबागांना फायदाच होईल असे वाटत असल्याचे खुळे म्हणाले.

१३ ऑक्टोबर पर्यन्त महाराष्ट्राबरोबर मुंबईसह



कोकणातही पावसाची शक्यता : दिड किमी उंचीवर महाराष्ट्राच्या भुभागावर ताशी २८ तर मुंबईसह कोकण किनारपट्टीवर ताशी ३७ किमी वेगाने पूर्वेकडून ह्या अरबी समुद्रातील हवेच्या तीव्र कमी दाब क्षेत्रामुळे वारे वाहत आहे. दोन्हीही समुद्रातून होणाऱ्या बाष्प पुरवठ्यामुळे रविवार १३ ऑक्टोबर पर्यन्त महाराष्ट्राबरोबर मुंबईसह कोकणातही हलक्या पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, परतीचा पाऊस अजुन नंदुरबार पर्यंतच जागेवर खिळलेला असल्याचे खुळे म्हणाले. मुंबईसह ठाणे कल्याण डोंबिवली, पश्चिम उपनगर, कुर्ला या भागात विजांच्या कडकडाटासह परतीच्या पावसाला सुरुवात झाली आहे. दरम्यान, अचानक आलेल्या या पावसामुळे चाकरमान्यांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. तसेच या पावसामुळं सखल भागात पाणी साचायला सुरुवात झाली आहे. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, मुंबईसह मुंबई पूर्व उपनगरे, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. पुढील १२० मिनिटांपर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी पाहायला मिळू शकतात, अशी माहिती हवामान विभागानं दिली आहे. परतीच्या पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचलं आहे. याचा मुंबईतील वाहतुकीवर परिणाम झाला आहे. संथ गतीनं वाहतूक सुरु आहे. त्यामुळं नागरिकांना त्रा सहन करावा लागतोय.

## रब्बीसाठी दोन लाख १० हजार टन खते मंजूर



पुणे : शेतकऱ्यांनी रब्बी हंगामाची तयारी सुरू केली आहे. शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन जिल्हास्तरावरून करण्यात आलेल्या मागणीनुसार विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयामार्फत कृषी आयुक्त कार्यालयाकडून दोन लाख १० हजार टन खते मंजूर करण्यात आली आहे. या खतांचे लवकरच वाटप करण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली.

यंदा जिल्ह्यात खरिपात शेतकऱ्यांसाठी दोन हजार ४३ कोटी ४३ लाख रुपयांचे पीक कर्जाचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यापैकी २ हजार २६२ कोटी ७६ लाख ५६ हजार रुपयांचे पीककर्ज घेतले आहे. त्यातच चांगला पाऊस पडल्याने भूजल पातळीत वाढ झाली आहे. पश्चिम पट्ट्यात पुरेसा पाऊस झाल्याने धरणे भरली आहेत. पूर्व पट्ट्यात चांगला पाऊस झाल्याने काही प्रमाणात पाणीपातळी वाढली आहे. त्यामुळे रब्बी हंगाम शेतकऱ्यांना चांगला जाण्याची शक्यता आहे. परंतु आर्थिक अडचणी असल्याने रब्बी हंगामातील पिकांची पेरणी करण्यासाठी कर्ज काढण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यासाठी पीडीसीसी बँकेने ६८१ कोटी २३ लाख रुपयांचे उद्दिष्ट ठेवले आहे. रब्बी हंगामात ज्वारीची पेरणी क्षेत्रात काही प्रमाणात वाढणार असल्याची स्थिती आहे. जिल्ह्यात रब्बीचे एकूण २ लाख २९ हजार ७१२ हेक्टर क्षेत्र आहे. चालू वर्षी खरिपात झालेल्या चांगल्या पावसामुळे रब्बी ज्वारीच्या पेरणीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. कृषी विभागाने जवळपास दोन लाख ८० हजार ५९५ हेक्टरवर पेरणी होण्याचा दावा कृषी विभागाने केला आहे. यात ज्वारीची सुमारे एक लाख ३० हजार हेक्टरवर पेरणीची शक्यता आहे. रब्बी ज्वारीपाठोपाठ गव्हाचे ४५ हजार हेक्टर क्षेत्र आहे. हरभऱ्यांचे ३६ हजार हेक्टर क्षेत्र आहे.

## पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेची लक्षणे आणि व्यवस्थापन

पपई पिकामध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे फुले व फळे तयार होण्यास अडथळा येतो. फुले फार लवकर कोमेजतात, ज्यामुळे फळांच्या उत्पादनात लक्षणीय घट होते. अशा परिस्थितीत, काही व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करून उत्पादक बोरॉनच्या कमतरतेचे दुष्परिणाम रोखता किंवा कमी करता येतात. बोरॉन हे पपई लागवडीतील एक महत्त्वाचे सूक्ष्म अन्नघटक आहे. कारण ते पेशींची निर्मिती आणि पुनरुत्पादन प्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे पपईमध्ये विविध लक्षणे दिसू शकतात, ज्यामुळे पिकाच्या एकूण आरोग्यावर आणि फळ उत्पादनावर वाईट परिणाम होतो. जाणून घेऊ या बोरॉन या अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे पपई पिकात दिसणारी विविध लक्षणे आणि त्यावरील व्यवस्थापन.

पपई पिकामध्ये बोरॉनच्या कमतरतेची मुख्य लक्षणे :विकृत पाने - पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेच्या सुरुवातीच्या लक्षणांपैकी एक म्हणजे कोवळी पाने विकृत होणे हे आहे. झाडाची पाने ठिसूळ होऊन वर किंवा खालच्या दिशेने गुंडाळले जातात. पानांच्या शिरा जाड होतात. पानांचा आकार लहान होतो, ज्यामुळे पाने कडक आणि विकृत दिसू शकतात. शिराजवळचा भाग पिवळा पडणे - बोरॉनच्या कमतरतेमुळे पपईच्या पानांमध्ये इंटरवेनल क्लोरोसिस यासारखी लक्षणे दिसतात. यामुळे पानांवर डाग पडतात किंवा ती पिवळी दिसतात. विशेषतः कोवळ्या पानांवर ही लक्षणे दिसतात. याशिवाय झाडाची वाढ खुंटते, फुले आणि फळांची वाढ होत नाही आणि मुख्य खोड तडकण्याचे प्रकार घडतात.

बोरॉनची कमतरता भरून काढण्याचे उपाय : पपईमध्ये बोरॉनची कमतरता दूर करण्यासाठी, बोरॅक्स (सोडियम बोरेट) किंवा



सोल्युबर (सोडियम पेंटाबोरेट) सारखी बोरॉनयुक्त खते जमिनीतून देता येऊ शकतात. कमतरतेच्या तीव्रतेनुसार आणि मातीच्या प्रकारानुसार शिफारशीप्रमाणे साधारणतः १-२ किलो बोरॅक्स प्रति हेक्टर डोस द्यावे. बोरॅक्स हे जास्त प्रमाणात जमिनीत घालू नये, कारण ते विषारी होऊ शकते. ०.२ ते ०.३% बोरॅक्स किंवा ०.१-०.२% सोल्युबरचे द्रावण झाडाची वाढ आणि पुनरुत्पादनाच्या अवस्थेत पानांवर फवारता येते. बोरॉनची पुरेशी पातळी राखण्यासाठी फुलधारणा आणि फळधारण अवस्थेत वारंवार फवारणी करणे गरजेचे असते.

बोरॉनची पातळी निश्चित करण्यासाठी आणि त्यानुसार खतांचा वापर समायोजित करण्यासाठी नियमितपणे माती परीक्षण करणे आवश्यक आहे. ७.० (अल्कलाईन) पेक्षा जास्त सामू असलेल्या मातीत बोरॉनची उपलब्धता कमी होते, त्यामुळे सेंद्रिय पदार्थ किंवा सल्फर सुधारकाद्वारे मातीचे सामू नियंत्रित केल्यास मातीद्वारे बोरॉनचे चांगले शोषण होऊ शकते. जास्त सामू (पीएच) किंवा कार्बोनेटयुक्त सिंचन पाणी बोरॉनची उपलब्धता कमी करू शकते. संतुलित मात्रात खनिज असलेल्या पाण्याचा वापर करून योग्य पाणी व्यवस्थापन करणे, झाडाजवळ अतिरिक्त पाणी साचणे किंवा पाण्याचा ताण टाळणे या उपायामुळे बोरॉन शोषण्यास मदत होऊ शकते. याव्यतिरिक्त, ठिबक सिंचनमुळे, मातीत योग्य प्रमाणात आर्द्रता राखण्यास मदत होते. बोरॉनच्या कमतरतेसह इतर पोषक तत्वांचे, विशेषतः कॅल्शियम आणि पोटॅशियमचे असंतुलन होते. यासाठी झाडाला संतुलित खत दिले पाहिजे, ज्यामध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांसह नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशियम यांसारख्या प्रमुख पोषक घटकांचा समावेश आहे, संपूर्ण झाडाच्या आरोग्यासाठी आणि वाढीस चालना देण्यासाठी हे आवश्यक आहे.

## जनावरांच्या कासदाहासाठी संवेदनशीलता चाचणी

दूध देणाऱ्या जनावरांमध्ये होणारा कासदाह एक महत्त्वपूर्ण आजार आहे, यामुळे कमी दूध उत्पादन, दुधाची गुणवत्ता बिघडल्यामुळे दूध टाकून द्यावे लागते. प्रतिजैविकांचा वेळेवर आणि विशिष्ट वापर आजाराची तीव्रता लक्षणीयरित्या कमी करण्यास उपयुक्त आहे. कासदाहामुळे सडातील संपूर्ण ऊतकांचे नुकसान होऊ शकते, ज्यामुळे जनावरांच्या उत्पादनक्षम आयुष्यात घट होते. तथापि, प्रतिजैविकांचा अनियंत्रित वापर केल्यामुळे सूक्ष्मजंतूंमध्ये प्रतिकारशक्ती विकसित होत आहे. म्हणून योग्य आणि प्रभावी प्रतिजैविक निवडीसाठी नियमित तपासणी करणे आजच्या काळाची गरज आहे. प्रतिजैविक संवेदनशीलता चाचणी म्हणजे सूक्ष्मजंतू विशिष्ट प्रतिजैविकांबद्दल किती संवेदनशील किंवा प्रतिकारक आहेत हे ठरवण्यासाठी केली जाणारी चाचणी. या चाचणीच्या माध्यमातून पशूतज्ज्ञ योग्य आणि प्रभावी औषध निवडू शकतात, ज्यामुळे संसर्ग प्रभावीपणे उपचार केला जाऊ शकतो.

कासदाहाचा प्रसार : कासदाहाचा प्रसार दूषित पाणी, उपकरणे तसेच दूध काढणाऱ्या व्यक्तीमार्फत होतो. संसर्गजन्य घटकांच्या प्रत्येक प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या संपर्कात आल्यानंतर प्रादुर्भाव होतो. बहुतेक वेळा जिवाणू हे शरीरांतर्गत निर्माण होणारेच असतात; कास, कातडी, जननेंद्रियांचा बाह्य भाग, श्वसनलिका आणि आतडी इत्यादी अवयवांमध्ये दिसतात.

आजाराची लक्षणे : बाधित सड किंवा सडाचा काही भाग सुजतो, स्पर्शास कठीण वाटतो. सडाच्या भागाला स्पर्श केल्यास किंवा दूध काढण्याच्या



वेळी वेदना होतात. बाधित जनावराचे दूध उत्पादन अचानक कमी होते. दुधात गुठळ्या, पाणीदारपणा, पिवळसर किंवा रक्ताच्या धारा दिसतात. दुधाचा रंग किंवा घट्टपणा बदलतो. गंभीर प्रकरणांमध्ये जनावरास ताप येतो.

असे करतात निदान : स्ट्रीप कप चाचणी. कॅलिफोर्निया कासदाह चाचणी. प्रयोगशाळेत बाधित जनावरांच्या दुधातील जीवाणूंचे विलगीकरण करून ओळख करणे.

प्रतिजैविक संवेदनशीलता चाचणीचे महत्त्व : तंतोतंत उपचार - गायींच्या कासदाहाला विविध जिवाणू कारणीभूत असतात. सर्वच जिवाणूंवर एकच प्रतिजैविक परिणाम करत नाही. प्रतिजैविक संवेदनशीलता चाचणीमुळे कोणते प्रतिजैविक सर्वाधिक प्रभावी आहे हे समजते, ज्यामुळे योग्य आणि जलद उपचार करता येतात. प्रतिजैविक प्रतिकारशक्ती - प्रतिजैविकांचा अविचाराने वापर केल्याने प्रतिकारशक्ती विकसित होते, ज्यामुळे भविष्यातील संसर्ग उपचार करणे कठीण होऊ शकते. संवेदनशीलता चाचणीमुळे योग्य प्रतिजैविकाचा योग्य वापर होतो, ज्यामुळे प्रतिजैविकांचा अयोग्य आणि जास्त वापर टाळता येतो. खर्च, प्रभावी उपचार - योग्य प्रतिजैविक ओळखून शेतकरी निष्फळ औषधांचा वापर टाळू शकतात, ज्यामुळे उपचारांचा खर्च कमी होतो आणि आजार लांबल्यामुळे होणारी दुधाची हानी टाळता येते. योग्य प्रतिजैविकामुळे गायींना लवकर बरे वाटते, ज्यामुळे दुधातील प्रतिजैविकांचे अंश किंवा संसर्गामुळे दूध फेकावे लागण्याचे प्रमाण कमी होते. आरोग्य - जलद आणि योग्य उपचारांमुळे बाधित प्राण्यांचे वेदना आणि आजारपण कमी होते, ज्यामुळे त्यांचे आरोग्य आणि कल्याण सुधारते. थोडक्यात, कासदाह प्रतिजैविक संवेदनशीलता चाचणीमुळे प्रभावी उपचार होतो, आर्थिक नुकसान कमी होते आणि प्रतिजैविक प्रतिकारशक्तीशी लढण्यासाठी मदत मिळते.

प्रतिबंधात्मक उपाय : जनावरांची कास व दूध काढणाऱ्याचे हात पूर्वी आणि नंतर जंतुनाशकाने धुवून घ्यावेत. गोठ्याची जमीन नियमितपणे स्वच्छ ठेवावी. सडावरील जखमांकडे दुर्लक्ष करू नये. दुधाची नियमित तपासणी करून घ्यावी. निर्जंतुक न केलेल्या वस्तू सडांमध्ये घालू नयेत. दूध काढण्यासाठी पूर्ण मूठ पद्धतीचा वापर करावा. दूध काढल्यानंतर किमान अर्धा तास जनावरास खाली बसू देऊ नये.

दूध काढणीनंतर सड जंतुनाशक द्रावणात बुडवून घ्यावेत. मिल्किंग मशिनचे कप स्वच्छ आणि निर्वात दाब योग्य प्रमाणात असावा.

दुधाचा नमुना गोळा करण्याची पद्धत : दूध तपासणीसाठी दुधाचा नमुना गोळा करताना सडातील दोन ते तीन धारा काढून टाकाव्यात, त्यानंतर निर्जंतूक सिरींज मागील पिस्टन काढून त्यात पाच मिलि दूध घ्यावे. दूध घेताना हवेचा संपर्क कमीत कमी असावा. दूध सिरींज मध्ये घेतल्यानंतर पिस्टन पूर्ववत लावावा. हा नमुना आवश्यक माहितीसह बर्फावर ठेवून चार ते सहा तासात प्रयोगशाळेत पाठवावा. बाधित जनावरांना प्रतिजैविके देण्याआधी नमुना गोळा करणे आवश्यक आहे.




### महत्वाच्या घटना

१६६६ : आग्र्याहून सुटका झाल्यानंतर शिवाजीमहाराज राजगड येथे सुखरुप पोहोचले.
१७८६ : ब्रिटीश इस्ट इंडियाचे अधिकारी लॉर्ड कॉर्नवॉलिस हे भारताचे गव्हर्नर जनरल बनले.
१८५७ : कॅलिफोर्निया गोल्ड रश मध्ये सापडलेले १३-१५ टन सोने घेऊन जाणारे एस.एस. सेंट्रल अमेरिका हे जहाज सोने व ४२६ प्रवाशांसह बुडाले.
१८७३ : टाइपराइटर पहिल्यांदा ग्राहकांना विकण्यात आले.
१९१९ : ॲडॉल्फ हिटलर यांनी जर्मन वर्कर्स पार्टी मध्ये प्रवेश केला.
१९३० : विल्फ्रेड र्‍होड्स यांनी आपला शेवटचा म्हणजे १११० वा प्रथमश्रेणी क्रिकेट सामना खेळला.
१९४८ : भारतीय सैन्य हैदराबाद संस्थानच्या हद्दीत शिरले. जुलुमी रझाकारांच्या मदतीने स्वतंत्र राहण्याचा निजामाचा हट्ट मोडून या फौजांनी हैदराबाद ताब्यात घेतले. हैदराबाद मुक्तीच्या या कारवाईचे वर्णन 'पोलिस ॲक्शन' असे केले जाते.
१९५९ : 'ल्यूना-२' हे मानवविरहित रशियन अंतराळयान चंद्रावर उतरले.
१९६६ : भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी डार्डनेल्स खाडी पार केली.
१९८० : तुर्कस्तानमधे लष्करी उठाव
१९९८ : डॉ. जयंत नारळीकर यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार प्रदान
२००२ : मेटसॅट या भारताच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.
२००५ : हाँगकाँगमधील डिस्नेलँड सुरू झाले.
२०११ : हल्ल्यांच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त एक समर्पण समारंभ पार पडल्यानंतर न्यूयॉर्क शहरातील स्मारक संग्रहालय सर्वांसाठी सुरु करण्यात आलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४९४ : फ्रान्सचा राजा फ्रान्सिस पहिला यांचा जन्म.
१६८३ : पोर्तुगालचा राजा अफोन्सो सहावा यांचा जन्म.
१७९१ : विद्युतशक्तीचे शास्त्रज्ञ मायकल फॅरेडे यांचा इंग्लंड येथे जन्म.
१८१८ : गॅटलिंग गन चे संशोधक रिचर्ड जॉर्डन गॅटलिंग यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८०३)
१८९४ : विभूतीभूषण बंदोपाध्याय जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक. 'पथेर पांचाली', 'अपराजित', 'आरण्यक' या त्यांच्या काही उत्कृष्ट कलाकृती होत. 'इच्छामती' या त्यांच्या कादंबरीला रविन्द्र पुरस्कार देण्यात आला. (मृत्यू: १ नोव्हेंबर १९५०)
१८९७ : आयरिन क्यूरी नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १७ मार्च १९५६)
१९१२ : फिरोझ गांधी इंदिरा गांधी यांचे पती, पत्रकार व राजकारणी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९६०)
१९४८ : मॅक्स वॉकर ऑस्ट्रेलियन क्रिकेट आणि फूटबॉलपटू (मृत्यू:)
१९७७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू नेथन ब्रॅकेन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१८ : ऑस्ट्रेलियाचे चौथे पंतप्रधान जॉर्ज रीड यांचे निधन.
१९२६ : विनायक लक्ष्मण भावे मराठी साहित्य संशोधक, ग्रंथकार आणि 'महाराष्ट्र सारस्वत' या मराठी साहित्येतिहास ग्रंथाचे लेखक, १८९३ मध्ये त्यांनी ठाणे येथे मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली. (जन्म: १८७१)
१९५२ : रामचंद्र गणेश कुंदगोळकर तथा 'सवाई गंधर्व' हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, खाँसाहेब अब्दुल करीम खाँ यांचे शिष्य, पं भीमसेन जोशी आणि गंगुबाई हनगळ यांचे गुरू, दादासाहेब खापर्डे यांनी त्यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी दिली. (जन्म: १९ जानेवारी १८८६)
१९७१ : जयकिशन डाह्याभाई पांचाळ 'शंकर-जयकिशन' या संगीतकार जोडीतील संगीतकार (जन्म: ४ नोव्हेंबर १९२९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते सतीश दुभाषी यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: १४ डिसेंबर १९३९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री शांता जोग यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: २ मार्च १९२५)
१९९२ : पं. मल्लिकार्जुन मन्सूर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, (ग्वाल्हेर घराण्याचे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य) नीलकंठबुवा अलुरमठ आणि (जयपूर घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अल्लादियाँ खाँ यांचे पुत्र) मंजी खाँ व भुर्जी खाँ असे तीन गुरू त्यांना लाभले, पद्?मविभूषण व कालिदास सन्मान आदी मानसन्मान त्यांना मिळाले. (जन्म: ३१ डिसेंबर १९१०)
१९९३ : अमेरिकन अभिनेता रेमंड बर यांचे निधन.
१९९६ : पं. कृष्णराव रामकृष्ण चोणकर मराठी व गुजराती संगीत नाट्य सृष्टीतील गायक अभिनेते, एक तपाहून अधिक काळ 'गंधर्व नाटक मंडळी'मध्ये नटसम्राट बालगंधर्वांचे नायक म्हणून त्यांनी काम केले. (जन्म:)
१९९६ : पद्मा चव्हाण चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री, स्त्रीसौंदर्याचा एक अनोखा नमुना म्हणून ख्याती असलेल्या पद्मा चव्हाणांच्या नाटकांच्या जाहिरातींत त्यांच्या नावाआधी 'मादक सौंदर्याचा ॲटम बॉम्ब' असे छापले जात असे. (जन्म: ७ जुलै १९४८)

# हॉलीबॉल संघाने मिळवलेले यश सर्वांसाठीच प्रेरणादायी - अ‍ॅड.कानडे



माजलगाव। प्रतिनिधी

जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेच्या हॉलीबॉल संघाने विभाग स्तरावर प्रथम येत राज्यस्तरासाठी पात्र होत मिळवलेले यश हे सर्वांसाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे अध्यक्ष तथा मंगलनाथ मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोटेरियन रवींद्र कानडे यांनी जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेच्या हॉलीबॉल संघाला रोटरी क्लबच्या वतीने स्पोर्ट शूजच्या वितरण प्रसंगी केले.पुढे बोलताना ते म्हणाले की,जिद्द,चिकाटी,परिश्रम व सततच्या सरावाने यश संपादन करता येते हे ग्रामीण भागातील व जिल्हा परिषद मध्ये शिकत असणाऱ्या मुलींनी सर्वांना दाखवून दिले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गरबडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे प्रोजेक्ट चेअरमन रोटेरियन सौ वर्षा सोळंके,सचिव लता जोशी, सौ सुरेखा गवळी मॅडम,गोविंदभाऊ बजाज,डॉ.शंकर जुजगर, लक्ष्मीनारायण मुंदडा,दामोदर संदीकर,जगदीश साखरे,राजेश देशपांडे डिस्ट्रिक सहाय्यक प्रांतपाल श्री विवेक गंगणे ,श्री निरंजन वाघमारे,,डॉ.स्वानंद कुलकर्णी,,श्री संदीप गुंडेवार,,यांचे मोलाचे सहकार्य लाभले. भारताची ज्ञानाई क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.त्यानंतर दहावीतील मुलींनी स्वागत गीत गायले.अतिथींच्या सत्कारानंतर शाळेचे सहशिक्षक बाळासाहेब सोनसळे यांनी प्रास्ताविक केले.त्यामध्ये त्यांनी सांगितले की,विभाग स्तरावर एकूण १४ संघ होते.त्यापैकी जिल्हा परिषद शाळेचा एकमेव संघ होता.या संघाने कोणतेही भौतिक साधने नसताना एकतर्फी विजय मिळवला.मुलींनी हे यश खेचून आणल्याबद्दल सर्व रोटरी सदस्यांनी मुलींचे कौतुक करून त्यांना दर्जेदार अशा स्पोर्ट शूजचे वितरण केले.या विजयी संघात कर्णधार अक्षरा पवार,शितल राठोड,सोमेश्वरी टाक,अस्मिता कुंभार,माधुरी गुणवंत,फारिया बेग,रुची दळवी,अनन्या चव्हाण,दिपाली शेळके,माधुरी तौर,अपेक्षा घेणे,रिया शिंदे हे खेळाडू आहेत. रोटरी क्लबच्या प्रोजेक्ट चेअरमन वर्षा सोळंके यांनी मुलींना शुभेच्छा देताना त्यांचा गौरव करून शाळेमध्ये नवरात्र महोत्सवानिमित्त नवदुर्गांचा गौरव केल्याची भावना व्यक्त केली.विशेष बाब म्हणजे गोविंदभाऊ बजाज यांनी सॉक्स साठी नगदी रक्कम शाळेला दिली.तसेच भविष्यात देखील शाळेला मदतीची गरज लागली तर रोटरी सदैव आपल्या पाठीशी राहील अशी ग्वाही दिली.हॉलीबॉल संघाचे प्रशिक्षक राजकुमार सोनपसारे व शेख अब्दुल यांचा सत्कार सर्व मान्यवरांच्या हस्ते झाला.या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख शरद नायबळ यांनी केले.शेवटी सर्वांचे आभार नारायण भाळशंकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिनकर वाघमारे, मधुकर मकसरे, चंद्रकांत यादव, विलास रेवलकर, बालासाहेब कांबळे, सुंदर काळे, मंदा सारूक, संगीता राठोड, संगीता शिंदे, ज्योती कोगीडरकर, जयश्री लोणीकर, हिरा मगर, हसीब सौदागर, बालासाहेब जामकर, गोरख उघडे यांनी परिश्रम घेतले



## अंबडला जायकवाडीच्या पाण्यासाठी गोदावरी पाटबंधारे मंडळात बैठक

अंबड । प्रतिनिधी

गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालयात खा.कल्याण काळे यांच्या पुढाकारातून जायकवाडी पाणी मागणी समितीच्या शिष्टमंडळाची दि.१० रोजी गोदावरी लाभक्षेत्र प्राधिकरणाचे संचालक संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता जयंत गवळी, सहाय्यक मुख्य अभियंता मंगेश खैरनार,अधिक्षक अभियंता समाधान संब्बीतवार, अधिक्षक अभियंता भरत शिगांडे, कार्यकारी अभियंता रोहित देशमुख यांचेसमवेत बैठक संपन्न झाली.

या बैठकीत अंबड तालुक्यातील अवर्षण प्रवन भागास जायकवाडी प्रकल्पातून पाणी देण्याची मागणी करण्यात येवून पाण्याअभावी तालुक्यातील शेतीचे होणारे नुकसान व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली भिषण टंचाई बाबत माहिती देण्यात आली.यावेळी प्राधिकरणाचे संचालक संतोष तिरमनवार यांनी लाभक्षेत्रातील उपलब्ध पाणी अवर्षण प्रवण भागास देण्याबाबत योजना तयार करून त्यास मंजूर करुन घ्यावी लागेल असे सांगितले. जायकवाडीच्या पाण्यावर लाभक्षेत्रातील लोकांचा अधिकार असल्याने त्यांच्या पाणी मागणीबाबत गंभीरपणे नोंद घ्यावी लागेल. बप्पासाहेब गोल्डे,चंद्रशेखर मोहरीर, अशोक शिंदे,बालासाहेब इंगळे,हनुमान धांडे,सिध्दार्थ रोटे,रामभाऊ लांडे, अमोल आढावे, कल्याण तारडे, अँड.रतन तारडे,अँड.मनोज तारडे, समद बागवान,कैलास जिगे,दिनेश काकडे,रवी राठोड,गजानन सानप, लक्ष्मण गाडेकर,बंडु पागीरे,राम शेळके, विजय शेळके,गोवर्धन भोरे,जगन दुर्गे, शाम राठोड,महेश रायकर,गोपाळ राठोड, दिलीप चव्हाण, रामदास कुरणकर ,ओम काकडे, बद्रीनाथ जंगले आदी उपस्थित होते.

## माजलगावात ४६४३ घरकुलांना मंजूरी-आ.सोळंके

माजलगाव। प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदार संघात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेत ४ हजार ६४३ लाभार्थ्यांना मंजुरी दिली असल्याची माहिती माजलगाव विधानसभेचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.



आमदार प्रकाश सोळंके यांनी मतदारसंघ वासियांना ऐन सणासुदीच्या काळात मोठे गिफ्ट दिले आहे. माजलगाव विधानसभा मतदार यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजने अंतर्गत वैयक्तिक घरकुल योजने मध्ये हजारो लाभार्थ्यांनी राज्य शासनाकडे प्रस्ताव दाखल केले होते. प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत सातत्याने मंत्री अतुल सावे यांच्याकडे आ. सोळंके यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे माजलगाव मतदारसंघातील ४ हजार ६४३ लाभार्थ्यांच्या प्रस्तावास दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्य शासनाने मंजुरी दिलेली आहे. याबद्दल इतर मागास बहुजन कल्याण विभागचे मंत्री ना. अतुल सावे यांचे आभार आ. प्रकाश सोळंके यांनी मानले. दरम्यान विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गरजू नागरिकांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेतून स्वत:चे पक्के घर बांधण्यासाठी १ लाख वीस हजार रुपयांचा निधी दिला जातो. मतदार संघात मोठ्या प्रमाणावर घरकुल मंजूर झाले असल्याचेही आ.सोळंके यांनी सांगितले.

## हमीभाव केंद्राचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करावी -बोराडे

केज । प्रतिनिधी

शेतीमाल विक्रीच्या माध्यमातून शेतकरी बांधवांची आर्थिक लूट होऊ नये यासाठी नाफेडच्या माध्यमातून केज येथे एका खरेदी केंद्रास मान्यता देण्यात आली असून या खरेदी केंद्रावर सोयाबीन , उडीद व मुगाची खरेदी करण्यात येणार आहे तरी १५ तारखेपर्यंत शेतकरी बांधवानी ऑनलाईन नोंदणी करावी असे आवाहन खवीसचे चेअरमन बालासाहेब बोराडे यांनी केले आहे

सद्य स्थितीला सोयाबीनला बाजारपेठेत अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे त्यामुळे शासकीय खरेदी केंद्र कधी चालू होणार याकडे त्यांच्या नजरा लागून होत्या आता नाफेडने केज तालुक्यात हमीभाव खरेदी केंद्रास मान्यता दिली आहे . हे खरेदी केंद्र तालुका खरेदी विक्री संघाच्या कार्यालय परिसरात १५ - १६ तारखेपासून सुरु करण्यात येणार आहे

### ऑनलाईन नोंदणी बंधनकारक

हमीभाव खरेदिकेंद्रावर शेतीमाल टाकण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करावी लागणार आहे व या नोंदणीकरिता ७/१२ , पीकपेरा २०२४-२५ , आठ अ , आधारकार्ड , राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकची झेरॉक्स , व फोटो अशी कागदपत्र लागणार आहेत

.त्यामुळे शेतकरी बांधवांनी आपल्या शेतमालाला योग्य भाव मिळावा याकरिता ऑनलाईन नोंदणी करणे गरजेचे राहणार आहे. बीड जिल्ह्यात सोयाबीनची खरेदी हेक्टरी ९.५ क्विंटल प्रमाणे , उडीद हेक्टरी ५.७० क्विंटल प्रमाणे तर मूग ५.५० हेक्टरी प्रमाणे खरेदी करण्यात येणार आहे . यात भविष्यात वाढ होण्याचीही शक्यता आहे तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी हामिकेंद्राचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करावी असे आवाहन चेअरमन बालासाहेब बोराडे यांनी केले आहे

## राज्यपाल राधाकृष्णन यांनी साधला मान्यवरांशी संवाद

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे आज जालना जिल्हा दौऱ्यावर आले असता, त्यांनी शासकीय विश्रामगृह येथे विविध लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, राजकीय पक्षांचे प्रमुख, जालना जिल्ह्याच्या विकासाच्या विषयाच्या अनुषंगाने चर्चा केली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील उद्योग, आरोग्य, क्रिडा, साहित्य, क्रिडा, लोकप्रतिनीधी, राजकीय, माध्यम क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती तसेच इतर विविध घटकातील व्यक्तींशी संवाद साधून त्यांच्या जालना जिल्ह्याच्या विकासाशी संबंधीत समस्या आणि अपेक्षांची माहिती जाणुन घेतली.यावेळी आमदार राजेश राठोड, आमदार कैलास गोरंट्याल, आमदार संतोष दानवे, आमदार बबनराव लोणीकर, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, मनपा आयुक्त संतोष खांडेकर, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक आदींची उपस्थित होते.

श्री. राधाकृष्णन म्हणाले की, कृषी क्षेत्रात सिंचन क्षमता वाढविण्यासाठी जिल्ह्यात जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणावर राबवावीत. पावसाचे पाणी थांबविण्यासाठी जल संधारणाची कामे करावीत. लघु, मध्यम आणि मोठ्या प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी संरक्षीत करण्याचे नियोजन करावे. रेशीम उत्पादनात जिल्ह्याने चांगले काम केले असुन, या उद्योगास बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच जिल्ह्यातील औद्योगिक विकासासाठी जे अडथळे येत आहेत, ते दूर करण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक प्रयत्न करावेत. नव उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी पोषक वातावरण तयार करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच जिल्ह्यातील खेळाडूंना विविध क्रिडा प्रकारासाठी प्रोत्साहीत करावे. प्रारंभी राज्यपालांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेत जिल्ह्याची वैशिष्ट्ये, समस्या, विकास कामांच्या स्थितीबाबतची माहिती घेतली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सादरीकरणाद्वारे माहिती सादर केली. राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी उद्योजकांशी चर्चा करून उद्योग क्षेत्रातील अडचणी जाणून घेतल्या. तसेच विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशीही चर्चा करून त्यांनी विकास प्रक्रियेबाबत त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच साहित्य, आरोग्य, सामाजिक, क्रीडा आणि माध्यम आदी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची भेट घेऊन त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी बैठकीला लोकप्रतिनीधी, प्रशासनातील, साहित्यिक, खेळाडू, माध्यम प्रतिनीधी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## संत जोडण्याचे काम करतात: मुनि विशेषसागर

अंबड। प्रतिनिधी

भगवान महावीर स्वामींनी आपल्या दिव्य देशनेत सांगितले होते की, माणूस जन्माने नाही तर त्याच्या कर्माने महान असतो. जो माणूस रोज देव दर्शन करतो, गाळून पाणी पितो आणि रात्रीच्या जेवणाचा त्याग करतो, तो आठ मुलगुणांचे पालन करतो, त्यालाच जैन म्हणण्याचा अधिकार आहे. उक्त उद्गार प. पू. श्रमण मुनिश्री १०८ विशेषसागर जी महाराज श्री १००८ महावीर दिगंबर जैन मंदिरात धार्मिक मेळाव्याला संबोधित करताना सांगितले



पू. मुनिश्री पुढे म्हणाले की, अंबडचे रहिवासी भाग्यवान आहेत कारण वेळोवेळी संतांचे मेळावे, चातुर्मास आयोजित करून त्यांची सेवा करण्याची संधी मिळते. आजही अशी किती गावे आणि शहरे आहेत जिथे संताचे आगमन व चातुर्मास करण्याची संधी मिळाली नाही . मुनीश्री म्हणाले की संत हे जगाचे वारसा आहेत, त्यांचे संपूर्ण जीवन जगाच्या, राष्ट्राच्या, धर्माच्या आणि समाजाच्या विकासासाठी आहे आणि व्यक्ती ला जोडण्याचे काम करता खरे तर अंबडवासीयांचे भाग्य आहे की, मुनीश्री विशेषसागर जी महाराज संघाचा २८ वा विरागमय वर्षायोग आयोजित करण्याची संधी लाभली. पू. मुनीश्रींनी मंगल प्रवेशाच्या दिवशी सांगितले होते की, हा वर्षायोग एका मंदिरासाठी नसून तीनही मंदिरांसाठी असेल, फक्त जैनांसाठी नाही तर जन - जणांचा असेल. अभुतपूर्व धार्मिक प्रभावामुळे मुनी संघाच्या चातुर्मासात लोकांना मुनिश्री दर्शनाचा लाभ आणि अमृतवाणी ऐकण्याची संधी मिळत आहे.मुनी श्रींच्या प्रेरणेने १००८ शांतीनाथ दिगंबर जैन मंदिर यात दोन गर्भगृहे, ३ वेद्या आणि २ शिखरे , श्री १००८ चंद्रप्रभू दिग. जैन मंदिरातील त्यागी निवास व श्री १००८ महावीर दिगंबर जैन मंदिरातील २ वेद्यांच्या जिर्णोधाराचे काम सुरू आहे.

संपूर्ण जैन समाजात पूज्य मुनिश्रींवर विशेष श्रद्धा व भक्ती दिसून येत आहे. प. पू.मुनीश्रींच्या प्रेरणेने महावीर मंदिरात सात दिवस अखंड नमोकार महामंत्राचे पठण सुरू असून त्याचा लाभ सुमारे ३०० आबाल वृद्धांना मिळत आहे. वरील माहिती अध्यक्ष सुरेंद्र बुर्ले यानी दिली

## वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंचे आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत यश

पाटोदा । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व बलभीम महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ व ९ ऑक्टोबर रोजी आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या खेळाडूंनी एकूण १३ पदके पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. यात चार सुवर्णपदके, सहा रजत पदके तर तीन कांस्य पदकांचा समावेश आहे.



या मैदानी स्पर्धांमध्ये सागर सानप याने लांब उडी स्पर्धेत सुवर्ण पदक तर १०० मी. धावणे स्पर्धेत रजत पदक पटकावले. सतीश हजारे याने लांब उडीमध्ये रजत पदक पटकावले. मुलींच्या लांब उडी स्पर्धेत वैष्णवी पठाडे हिने सुवर्णपदक पटकावले तर ५००० मी. धावण्याच्या स्पर्धेत तिने कांस्य पदक पटकावले आहे. ८०० मी. धावण्याच्या स्पर्धेत चांगदेव निंबाळकर या खेळाडूने कांस्य पदक प्राप्त केले आहे तर मानव राजपूत याने २०० मी. व ४०० मी. धावण्याच्या स्पर्धेत सुवर्ण पदके पटकावली आहेत. चिन्मय चव्हाण याने २०० मी. धावण्यात कांस्य पदक तर ४०० मी. धावण्यात रजत पदक पटकावले आहे. ४ १०० मी. रिले स्पर्धेत मुलांनी रजत पदक पटकावले, ४ १०० मी. रिले स्पर्धेत मुलींनी रजत पदक तर ४ ४०० मी. धावणे रिले स्पर्धेत मुलांनी कांस्य पदक पटकावत नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे. या सर्व खेळाडूंना क्रीडा विभागाचे डॉ. सय्यद शानूर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सर्व खेळाडूंच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सतिष माउलगे, डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, क्रीडा विभागाचे डॉ. सय्यद शानूर, डॉ. तानाजी आगळे उपस्थित होते. नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालय घनसावंगी

**दुरध्वनी क्रमांकः-०२४८३-२७२१८६**

E-MAIL ID : tahghan@gmail

**जा.क्र.२०२४/एमएजी/कावी-८२४ दिनांक:-२७/०८/२०२४**

वाचा :- १. जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिशियम - २०२३, २. श्री./श्रीमती किर्ती सारंगधर बरसाले रा. अंतरवाली दाई ता. घनसांवगी जि. जालना यांचा अर्ज दि.२७.०८.२०२४, ३. या कार्यालयाची तजवीज दिनांक २७/०८/२०२४

### जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत. सर्व जनता मौजे अं.दाई ता. घनसावंगी यांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, श्री./श्रीमती/कु.किर्ती सारंगधर बरसाले रा. अंतरवाली दाई ता.घनसांवगी जि.जालना येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन त्यांनी त्यांचा/त्यांची/मुलगा/स्वतः नामे किर्ती सारंगधर बरसाले यांचा / हिच्या जन्म दि.०२/०२/१९९५ ही दर्शविलेली आहे. अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/ आक्षेप/ आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/०८/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

स्वाक्षरित

**तालुका दंडाधिकारी घनसावंगी**

## शिवराज फाटे यांना रेशीमरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार

### फाटेंच्या कार्यामुळे भविष्यात देश पातळीवरील पुरस्कार मिळतील - अरुण राऊत

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील टाकरवाडी येथील आधुनिक शेती करणारे शेतकरी शिवराज पाटील फाटे यांचा सहपरिवारासह माजलगाव भाजपाच्या वतीने सत्कार करण्यात आला आत्तापर्यंत केलेल्या कार्याबद्दल त्यांची दखल घेत त्यांना रेशीमरत्न या पुरस्काराणे अमरावती येथे सन्मानित करण्यात आले त्याचाच एक भाग म्हणून माजलगाव भाजपाच्या वतीने भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत यांच्यासह पदाधिकारी यांनी शासकीय विश्रामगृह येथे शिवराज फाटे यांचा सहपरिवार सत्कार करण्यात आला.



यावेळी राऊत म्हणाले माजलगाव तालुक्यातील टाकरवाडी येथील शेतकरी शिवराज धर्मराज फाटे या शेतकऱ्याने मागील आठ ते दहा वर्षापासून रेशीम उद्योगामुळे ऊस उत्पादनात भरीव कामगिरी तर केलीच पण फाटें यांनी तालुक्यातील व तालुक्याच्या बाहेरील अनेक शेतकऱ्यांना रेशीम शेती करण्यासाठी निशुल्क माहिती देऊन रेशीम शेती करण्यासाठी प्रोत्साहित करून मार्गदर्शन केले त्यांच्या या कार्यामुळे रेशीम शेतीच्या माध्यमातून कोश उत्पादनात भरीव कामगिरी करून अनेक शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे, येणाऱ्या काळात फाटे हे निश्चितच हजारो शेतकऱ्यांना कोष उत्पादनात भरीव कामगिरी करतील व त्यामुळे पुढील काळात त्यांना निश्चितच देश पातळीवरील मोठमोठे पुरस्कार मिळतील.फाटे यांच्या या उत्कृष्ट कार्याबद्दल उपस्थित सर्व भाजपा पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील. वाटचालीस शुभेच्छा दिल्या . यावेळी राऊत म्हणाले फाटे यांना हा पुरस्कार अमरावती पालकमंत्री चंद्रकांत पाटील,खासदार डॉक्टर अनिल बोंडे,नागपूर येथील रेशीम संचनालयाचे उपसंचालक डॉ मच्छिंद्र ढवळे सह आदी मान्यवरांचे हस्ते शिवराज फाटे पती-पत्नीचा सत्कार करण्यात आला.येणाऱ्या काळात यापेक्षाही देश पातळीवरील मोठमोठे पुरस्कार फाटे परिवारास मिळतील अशा शुभेच्छा राऊत य यावेळी दिल्या व त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या सत्काराच्या कार्यक्रम प्रसंगी माजी नगराध्यक्ष अशोक तिडके , ईश्वर खुरपे,माजी नगरसेवक विनायक रत्नपारखी, मराठवाडा भाजपा सोशल मीडियाचे संयोजक दत्ता महाजन, बाबासाहेब आगे बाळासाहेब क्षीरसागर रसागर,अनंत जगताप,कैलास खुरपे,रवी कुराडे, खय्युम पठाण,रवी गायकवाड,मल्हारी ढगे,प्रल्हाद दळवी, सुग्रीव शिंगाडे, बाळासाहेब धपाटे, तुळशीराम बडे,शरद पवार, संजय पवार,राजेश मिटकरी यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जालना जिल्ह्यातून तीन हजार गाड्या भगवान गडावर जाणार-मुंडे

जालना। प्रतिनिधी

विचारांचे सोने लुटण्यासाठी भगवान गडावर जालना जिल्ह्यातून तीन हजार गाड्या जाणार अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये सत्संग मुंडे यांनी दिली. तसेच ते म्हणाले की जयत तयारी समाजबांधवांकडून करण्यात येत आहेस्व. गोपीनाथ मुंडे यांनी सुरू केलेली भगवान गडावरील दसरा मेळाव्याची परंपरा आजही जपली जाते. या मेळाव्यासाठी राज्यातील विविध समाज बांधव भगवान गडावर येतात. यंदा हा दसरा मेळावा शनिवारी होत असून, पंकजा मुंडे यांच्या विचारांचे सोने लुटण्यासाठी जिल्ह्यातील सर्व समाजातील बांधवांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा समन्वय समितीचे सदस्य सत्संग मुंडे यांनी केले आहे.

दसरा मेळावा भगवान भक्तिगड समितीच्या वतीने बुधवारी राष्ट्रमाता विद्यालयात पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी भाऊसाहेब घुगे, सुहास मुंडे, ईश्वर घाईत, ओमप्रकाश चितळकर, डॉ. श्रीमंत मिसाळ सिद्धेश्वर केकान व इतरांची उपस्थिती होती. जिल्ह्यातून किमान तीन हजार गाड्या या मेळाव्यास जाणार असल्याचे सांगण्यात आले.

राज्य लोकतंत्र
शनिवार, दि.१२ ऑक्टोबर २०२४ | ६

# श्री योगेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवात नवमीच्या दिवशी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते विधिवत पूजा, होम हवन व पूर्णाहुती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रासह अंबाजोगाई शहराचे ग्रामदैवत माता श्री योगेश्वरी देवीच्या नवरात्र उत्सवाची सांगता जिल्हाधिकारी श्री व सौ अविनाश पाठक यांच्या हस्ते विधिवत पूजा होमहवन करून पूर्णाहुती देण्यात आली. या नवरात्र उत्सवादारम्यान राज्याच्या काना कोपऱ्यातुन जवळपास चार ते पाच लाख भाविकांनी श्री योगेश्वरी देवीच्या दर्शनाचा लाभ घेतला.महाराष्ट्राचे शक्तीपीठ व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या येथील श्री योगेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवास गुरुवारी घटस्थापनेने प्रारंभ झाली होती. आज देखील नवमीच्या दिवशी शुक्रवारी जिल्हाधिकारी अविनाश पाठक व त्यांच्या सौभाग्यवती यांनी विधिवत श्री. योगेश्वरी देवीची महापूजा , होमहवन व पूर्णाहुती संपन्न केली .या महापूजे दरम्यान व नंतर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

श्री योगेश्वरी देवीचे नवरात्र महोत्सव ३ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर या कालावधीत संपन्न झाला. नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने राज्याच्या कानाकोपऱ्यातून चार ते पाच लाख भाविक देवीच्या दर्शनासाठी आले होते. त्या पार्श्वभूमीवर मंदिर सुरक्षा व्यवस्थेसाठी मंदिर प्रशासनाच्या व विश्वस्त मंडळाच्या वतीने ठोस उपाययोजना आखण्यात आली होती. लोकांचा वेळ वाचवा यासाठी विशेष पासची देखील मंदिर प्रशासनाच्या वतीने सोय करण्यात आली होती. या दरम्यान दररोज महाप्रसाद देखील भाविक भक्तांना पुरविण्यात आला होता. या महाप्रसादाचा लाभ देखील हजारो भाविकांनी घेतला.




## चार ते पाच लाख भाविकांनी श्री योगेश्वरी देवीचे घेतले दर्शन

शुक्रवारी गुरुवारी सकाळी ८ वाजता जिल्हाधिकारी अविनाश पाठक व त्यांच्या सौभाग्यवती यांनी विधिवत श्री. योगेश्वरी देवीची महापूजा केली. यावेळी पदसिद्ध अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे, मुख्याधिकारी प्रियंका टोंगे, देवल कमेटीचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी,सचिव अशोक लोमटे,ऍड विष्णुपंत सोळंके, कोषाध्यक्ष शिरीष पांडे, विश्वस्त संजय भोसले,प्रवीण दामा, हंसराज देशमुख, डॉ.संध्या जाधव,सतीश लोमटे,अमोल लोमटे, राजपाल भोसले, राजाभाऊ लोमटे,अमित चव्हाण, रवि कदम यांच्यासह मानाचे मानकरी, पुरोहित व भक्तांची उपस्थिती होती. या नवरात्र महोत्सवात दररोज मंदिरात संगीत, भजन, कीर्तन,प्रवचन,व विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबविले गेले. भाविकांनी या सर्व कार्यक्रमाचा मोठया प्रमाणावर लाभ घेतला. शनिवारी दसऱ्यानिमित्त दुपारी १ वाजता श्री योगेश्वरी देवीची पालखी प्रतिवर्षी प्रमाणे शहरातील नियोजित मार्गावरून सीमोल्लंघनासाठी निघणार आहे. त्यामुळे देवीच्या पालखीचा सोहळा संपन्न करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. त्याचबरोबर भाविकांनी या नवरात्र उत्सवादारम्यान केलेल्या सहकार्याबद्दल आलेल्या सर्व भाविक भक्तांचे आभार देखील मंदिर प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आले आहेत.

## रविवारी जगमित्र लिंगाडे यांचे तबलावादन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



येथील संगीत साधना मंचच्या वतीने शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठी मासिक सभा होणार असून रविवार १३ आक्टोंबर राेजी होणाऱ्या सभेत छत्रपती संभाजीनगर येथील प्रख्यात तबलावादक तालयोगी पद्मश्री पं.सुरेश तळवळकर यांचे शिष्य जगमित्र लिंगाडे यांचे स्वतंत्र तबला वादन होणार आहे संवादिनीवर यश खडके हे साथसंगत करतील खोलेश्वर महाविद्यालयात सायंकाळी साडेसहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने केले आहे.

## भगवान भक्तीगड, नारायणगडावर जाणाऱ्या १० हजार भाविकांसाठी अल्पोपहाराची सोय

**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगड आणि शिरूर कासार तालुक्यातील नारायणगडावर आज (दि.१२) दसरा मेळाव्यानिमित्त जाणाऱ्या १० हजार भाविकांसाठी अल्पोपहाराची सोय केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, समर्थकांच्या पुढाकारातून हे नियोजन करण्यात आले. बीड शहरानजिक असलेल्या नवगण शिक्षण संस्था संचलित सैनिकी विद्यालयासमोरील मुख्य रोडलगत भाविकांसाठी स्टॉल उभारून आज दिवसभर अल्पोपहार, पाण्याची उत्तम सोय केली जाणार आहे. या मार्गावरून भगवान भक्तीगड, नारायणगडावर जाणाऱ्या भाविकांनी अल्पोपहाराचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ.योगेश, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.



**डॉ.योगेश, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून नियोजन**

## पक्षाने संधी दिल्यास आपण परळी विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवण्यास तयार -अभिजीत देशमुख

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

पक्षाने संधी दिल्यास परळी विधानसभा मतदार संघातून महाविकास आघाडीकडून निवडणूक लढवण्यास आपण तयार आहोत अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे युवक नेते व पक्षाच्या युवा आघाडीचे माजी प्रदेश सरचिटणीस अभिजीत उत्तमराव देशमुख तसेच महाराष्ट्रा शेतकरी शुगर, ली (सायखेडा). आत्ताचा-२१ शुगर, यूनिट-२ चे संस्थापक अध्यक्ष यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

श्री देशमुख यांच्या गणेशपार भागातील ''विठाई निवास'' ह्या त्यांच्या निवासस्थानी शुक्रवारी (दि. ११) ही पत्रकार परिषद झाली. श्री देशमुख म्हणाले, परळीच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात माझे काका माजी नगराध्यक्ष कै. एन. के. देशमुख (मालक) यांनी उल्लेखनिय कार्य केले आहे. परळी पालिकेचे अध्यक्ष असताना त्यांनी शहराच्या सर्वांगिण विकासासाठी विविध विकास योजना कार्यान्वित केल्या, शासन दरबारी आपले संबंध वापरून त्यांनी शहराच्या विकासासाठी निधी खेचून आणला, परळीचा सर्वांगिण विकास करण्यात कै. एन. के. देशमुख (मालक) यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी परळी शहराच्या विकासासाठी केलेले कार्य परळीकर कधीही विसरू शकनार नाही. कै.एन. के. देशमुख मालकांचा वारसा पुढे चालवण्यासाठी श्री अभिजीत देशमुख यांनी परळीच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला आणी गेल्या दोन दशकांपासून परळीच्या व्यापार उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले अभिजीत देशमुख यांनी परळी परिसरातील सायखेडा (ता. सोनपेठ) येथे महाराष्ट्र शेतकरी शुगर या साखर कारखान्याची पान ३ वर



## सरपंच अजय शिंदेसह अनेकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मालीपारगाव येथील भाजपाचे सरपंच अजय शिंदे यांचेसह अनेक युवकांनी माजलगाव मतदार संघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके व जयसिंग सोळंके यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये माली पारगाव कॅम्प येथे शुक्रवार रोजी झालेल्या कार्यक्रमात प्रवेश केला. यावेळी आ. सोळंके यांनी अजय शिंदे यांचेसह युवकांचे पक्षात स्वागत करून अभिनंदन केले व पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी अच्युतराव लाटे, बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, शिवाजी सोजे, राजेश मेंडके, बबन खंडागळे, पाराजी आगे, नारायण बादाडे यांच्या सह मान्यवर उपस्थित होते. सरपंच अजय शिंदे यांची परिसरामध्ये चांगली ओळख असून ओबीसी समाजामध्ये त्यांनी कार्यकर्तृत्वावर एक वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. विधानसभा पान ३ वर

## शासकीय योजनेतील लाभार्थ्यांची पिळवणूक थांबवा ; संभाजी ब्रिगेडचे लाक्षणिक उपोषण

**उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, आंदोलनाचा इशारा**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी भुमीहीन शेतमजुर व श्रावणबाळ योजना यातील लाभार्थ्यांची पिळवणूक थांबवा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली. याप्रश्नी गुरूवार, दिनांक १० ऑक्टोबर रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. तसेच ८ विविध मागण्यांचे उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. याबाबत तात्काळ कार्यवाही झाली नाही तर पुढील काळात आंदोलन करण्यात येईल असा इशारा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांनी दिला आहे.




संभाजी ब्रिगेडच्या वतीने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी भूमीहीन शेतमजुर योजना व श्रावणबाळ योजना यात अनेक दिवसांपासून व अनेक वर्षांपासून या लाभार्थ्यांचे अर्ज पडून असतात. परंतु, त्या अर्जावर लवकर कार्यवाही होत नाही. तरी त्या अर्जावर लवकर कार्यवाही करावी तसेच या योजनेतील फाईल धुळखात पडलेल्या असतात अर्जदारास कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची माहिती दिली जात नाही. अर्जदार हा अनेक वेळेस आपल्या कार्यालयात येवून हेलपाटे मारतो. परंतु, त्याला योग्य न्याय दिला जात नाही. अर्जदार जेव्हा कार्यालयात जावून त्यांची फाईल मंजुर झाली की, नाही त्याला उत्तर मिळते अजुन मिटींग झाली नाही. तरी या लाभार्थ्यांच्या प्रकारणांची योग्य माहिती घेवून त्यांना न्याय द्यावा तसेच त्यांच्या पुढील मागण्या मान्य करावयात. मागण्या अशा १) दिव्यांग व विधवा महिलांचा अंत्योदय अन्न योजनेत समावेश करावा, २) संजय पान ३ वर

## आ.कैलास गोरंट्याल यांच्या पाठपुराव्याची दखल

**रामनगर येथील ग्रामीण रुग्णालय इमारतीचे काम पूर्ण करण्याचे आरोग्य मंत्र्यांचे निर्देश**

जालना । प्रतिनीधी

आ. कैलास गोरंटयाल यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या रामनगर येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालय इमारतीचे अर्धवट अवस्थेत असलेले काम तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश राज्य शासनाच्या आरोग्य विभागाचे सहसंचालक डॉ.सुनीता गोल्हाईत यांनी आरोग्य विभागाचे उपसंचालक आणि जालना येथील जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांना दिले आहेत.



जालना विधानसभा मतदार संघातील रामनगर ता.जालना येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर असून सदर रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी आवश्यक तरतूद देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. या इमारतीचे जवळपास अर्धे काम करण्यात आल्यानंतर कंत्राटदार एजन्सीने सदर काम अर्धवट अवस्थेत सोडून पुढील काम करण्यास टाळाटाळ करत असल्याचे आ. कैलास गोरंटयाल यांनी राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांना लेखी पत्र देऊन उपरोक्त सर्व प्रकार त्यांच्या निदर्शनास आणून दिला आहे. रामनगरशी परिसरातील जवळपास ३५ ते ४० गावातील लोकांचा दैनंदिन संपर्क येतो. जवळपास प्राथमिक आरोग्य केंद्र आणि रुग्णालय नसल्याने रुग्णांसह नातेवाईकांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे सांगून सदर पान ३ वर

## डॉ.अंजलीताई घाडगे यांनी अंबाजोगाई – केज तालुका काढला पिंजून

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**केज मतदारसंघातील अंबाजोगाई आणि केज या तालुक्यात गुरूवार, दिनांक १० ऑक्टोबर रोजी डॉ.अंजलीताई घाडगे यांनी झंझावाती जनसंपर्क दौरा करून दोन्ही तालुके पिंजून काढले आहेत.**




सध्या प्रत्येक गावात नागरिकांकडून डॉ.अंजलीताई यांचे सहर्ष स्वागत करण्यात येत आहे. यावरून केज मध्ये यावेळी परिवर्तन होऊन डॉ.अंजलीताई यांच्या माध्यमातून तुतारी वाजणार असल्याची चर्चा जनतेत सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ.घाडगे यांनी केज विधानसभा मतदारसंघात गुरूवारी अंबाजोगाई आणि केज तालुक्यातील अनेक गावांना भेटी दिल्या. यात अंबाजोगाई येथील सर्वज्ञ दासोपंत मंदिर देवघर येथे दर्शन घेतले. तसेच सुप्रसिद्ध वक्ते विकास कुलकर्णी यांच्या वक्ता दशसहस्त्रेषु वकृत्व विकास अकादमीला सदिच्छा भेट दिली. तसेच त्यांनी केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली, देवगाव, येवता, विडा, लव्हुरी, कानडी माळी या गावांचा दौरा केला. या प्रसंगी दहिफळ वडमाऊलीचे पंचायत समितीचे माजी सभापती पिंटूभैय्या ठोंबरे, येवता गावच्या सरपंच जोगदंड, विडा गावचे सरपंच पटाईत, लव्हुरी गावचे सरपंच चाळक यांनी अंजलीताईंच्या संपर्क दौऱ्यानिमित्त स्वागत केले असता, गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व सोबत कपिल मस्के, शितलताई लांडगे, पत्रकार गौतम बचुटे व रणजीत घाडगे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. गावकऱ्यांच्या गाठीभेटी घेत अहोरात्र त्या फिरत आहेत. त्यांना गावागावात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान गुरूवारी ही त्यांचे नागरिकांनी जंगी स्वागत केले. तसेच प्रत्येक गावांमध्ये जाऊन युवती, महिला, भगिनींशी ही डॉ.अंजलीताई या संवाद साधत आहेत. प्रत्येक ठिकाणी होणाऱ्या भव्य सत्कारामुळे डॉ.अंजलीताई भारवलेल्या पहावयास मिळाल्या, केज विधानसभा मतदारसंघात डॉ.अंजलीताई यांचे जंगी स्वागत होत आहे. तसे तर केज मतदारसंघ हा कायम पान ३ वर

## आझाद क्रांती सेनेच्या वडवणी तालुका प्रमुखपदी महादेव आवाड यांची निवड



**वडवणी । प्रतिनिधी**

आज दि.१०-१०-२०२४ रोजी वडवणी येथे आझाद क्रांती सेनेच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.हि बैठक आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.या बैठकीमध्ये आझाद क्रांती सेनेच्या वडवणी तालुका प्रमुख म्हणून चळवळीतील अनुभवी महादेव आवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.सर्व बहुजनांना सोबत घेऊन तालुक्यातील शेतकरी,शोषीत,पिडीत,कष्टकरी,शेतमजुर, कामगार, विद्यार्थी,कलाकार,यांचे प्रश्न शासन दरबारी मांडुन न्याय देण्याचा प्रयत्न आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातुन करणार आसल्याचे यावेळी महादेव आवाड यांनी सांगीतले.यावेळी आझाद क्रांती सेनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष महादेव आवाड यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे, माजी सरपंच सुभाष साळवे, माजी सरपंच आरुण आवाड,ॲड सचिन पान ३ वर

# मातंग समाजाच्या विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालयावर धडकला मोर्चा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव तालुक्यातील मातंग समाजाच्या विविध मागण्या संदर्भात माजलगाव तहसील कार्यालयावर अमोल शेरकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो लोकांचा मोर्चा दि ११ ऑक्टोबर शुक्रवार रोजी दुपारी १;०० वाजता धडकला.**





सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावा याबरोबरच मातंग समाज हा अतिशय उपेक्षित असल्याने त्याचे वर्गीकरण करून त्याला न्याय मिळवून देण्यासंदर्भात शासनाकडून अ,ब, क व ड करण्यात यावे तसेच महाराष्ट्रात अस्तित्वात असलेले लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महामंडळाला कायमस्वरूपी चेअरमन देऊन रिक्त जागा भरण्यात यावे व ज्या लाभार्थ्यांनी आजपर्यंत कर्ज घेतले आहे त्या सर्वांचे कर्ज माफ करण्यात यावे याबरोबरच गायरान धारकांच्या ताब्यात असलेल्या जमिनी कायमस्वरूपी नावे करून देण्यात यावीत ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी तालुकास्तरावर वस्तीगृह निर्माण करून मुलांना मोफत शिक्षण देण्यात यावे अशा विविध मागण्यासंदर्भात माजलगाव तहसील कार्यालय दि ११ ऑक्टोबर शुक्रवार रोजी दुपारी १:०० वाजता मोर्चेचे आयोजन करण्यात आले होते.या मोर्चात माजलगाव, वडवणी,धारूर या परिसरातून महिलांचा लक्षणीय सहभाग दिसून आला.या मोर्चाचे नेतृत्व अमोल शेरकर यांनी केले हा मोर्चा डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकातून छत्रपती संभाजी राजे चौक आणि नंतर तहसील कार्यालयावर धडकला.या मोर्चाला पोलीस प्रशासनाकडून बंदोबस्त चोख देण्यात आला होता.या मोर्चाचे निवेदन तहसीलदार यांनी स्वीकारले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# हर्षवर्धन पाटलांविरोधात स्थानिक नेते एकत्र, इंदापूरात मेळावा घेत शरद पवारांनाही दिला इशारा

**बारामती । प्रतिनिधी**

इंदापूर: विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय क्षेत्रात घडामोडींना वेग आला आहे. अशातच काही दिवसांपुर्वी माजी मंत्री आणि भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे. त्यांच्या पक्षप्रवेशानंतर निवडणुकीत इंदापूर मतदारसंघातून हर्षवर्धन पाटील तुतारी चिन्हावर निवडणूक लढण्याची आता शक्यता आहे. हर्षवर्धन पाटील यांच्या निर्णयाने इंदापुरातील राजकीय चित्र पालटलं आहे. मात्र, हर्षवर्धन पाटील यांच्या पक्षप्रवेशाने आता पक्षातील काही नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांची नाराजी उघड झाली आहे.

इंदापूरात हर्षवर्धन पाटील यांच्याविरोधात शरद पवारांच्या पक्षातील नेते एकवटल्याचं चित्र इंदापूरात दिसून आलं. प्रवीण माने, अप्पासाहेब जगदाळे, भरत शाह यांच्या उपस्थितीत आज इंदापुरात परिवर्तन मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित होते. या मेळाव्यामध्ये शरद पवार यांनी आपला निर्णय मागे घ्यावा नाहीतर महाराष्ट्रातील मोठी बंडखोरी इंदापूरमध्ये होईल. असा इशारा दशरथ माने



यांनी परिवर्तन मेळाव्यातून इशारा दिला आहे. परिवर्तन मेळाव्यावेळी बोलताना अप्पासाहेब जगदाळे म्हणाले, आज इंदापुरात मोठ्या संख्येने लोक जमले आहेत. इंदापूर तालुक्यात वेगळ्या चर्चा सुरू झाल्या आहेत. ज्याच्यांमध्ये धमक असते तोच काम करतो. लोकांसमोर काही गोष्टी स्पष्ट झाल्या पाहिजे. गेल्या आठ दिवसांमध्ये काय घडामोडी घडल्या, लोकसभा निवडणुकामध्ये कोणी - कोणी प्रामाणिक काम केले ते कळायला हवं. गेल्या २०-२५ वर्षे राजकारणात जबाबदार व्यक्ती म्हणून काम करत आहे. २०१४ साली अडीच वर्ष अगोदर मला सांगितले, मला लढायला सांगितले. निवडणुकीला अर्ज भरायला ४ दिवस बाकी राहिले तेव्हा अप्पासाहेब मलाच उभं राहायचं सांगितले, आमची समजूत काढली, पवार कुटुंबाचं मी ऐकलं. या निवडणुकीत प्रामाणिकपणे काम केले. २०१४ची निवडणूक झाली, २०१९ मध्ये पण, मी साहेबांकडे चार वेळा चक्करा मारल्या. मात्र,२०१४, २०१९ साली देखील नाही, आता आपलं काही खरं नाही असं वाटतंय असंही त्यांनी यावेळी बोलताना म्हटलं आहे. अनेकदा माझ्यासारखा भोळा भाबडा कार्यकर्ता बऱ्याचदा बळी पडला आहे. विश्वास दिला, चर्चा झाल्या अनेक लोक साक्षीदार आहेत. यावेळी मदत करा, पुढच्या वेळी मी तुम्हाला मदत करतो असं राजकारण झालं. गेली २५,३० वर्ष या तालुक्यात काम करताना आमचं कुठे चुकलं? आम्ही कुणाचे पैसे घेतले नाहीत. पदरचे पैसे खर्च करतोय. आज आम्ही अपक्ष उभं राहायचा विचार करतोय. मेळाव्यातून लोकांसमोर भूमिका घेऊ असं आमचं ठरलं. उद्याच्या निवडणुकीत आपल्याला काय करायचं हे जनतेनं सांगावे असं असंही यावेळी मेळाव्यात अप्पासाहेब जगदाळे म्हणाले आहेत.

## आम्ही सर्वजण बसून निर्णय घेऊ

लोकांच्या भावना नेत्यांपर्यंत पोहोचवाव्या म्हणून परिवर्तन मेळाव्याचे आयोजन केले आहे. या विधानसभा निवडणुकीमध्ये तरुणांना संधी द्यावी पाच वर्षात तालुक्याचा चेहरा मोहरा बदलण्याची आमची क्षमता आहे.या मेळाव्याची उपस्थिती पाहून कळते की आमचे काम चालते आहे. दहा वर्षे ज्यांना घरी बसवले त्यांनाच पक्षाने उमेदवार जाहीर केली. सुप्रिया सुळे यांच्याबद्दल आम्हाला आदरच आहे. जनतेवर आणि तालुक्यावर अन्याय केलेल्या माणसाला पक्षात घेणे दोन वेळा पराभव झाल्यानंतर असं त्यांनी काय चांगलं काम केलं त्यांना संधी दिली जाते हा जनतेवर लाभलेला उमेदवार आहे. हा निर्णय मी एकटा घेऊ शकत नाही आम्ही सर्वजण बसून हा निर्णय घेऊ स्पष्ट करायला जनतेला वेळ मागितला आहे.

## इंदापूरची बंडखोरी परवडणारी नाही म्हणत शरद पवारांना इशारा

इंदापूरची बंडखोरी परवडणारी नाही. इथलं मोहोळ महाराष्ट्रात उठणार आहे. हा आवाज जनतेचा आहे. आवाज कुणी थांबवू शकत नाही. संपूर्ण महाराष्ट्रात याचे पडसाद उमटतील. प्रामाणिकपणा महत्त्वाचा आहे. लोक प्रामाणिकपणाला साथ देतात. कुठल्याही दबावाला बळी पडणार नाही हे लक्षात घ्या, शरद पवार यांनी आपला इंदापूरमधील निर्णय मागे घ्यावा नाहीतर महाराष्ट्रातील मोठी बंडखोरी इंदापूरमध्ये होईल असा इशारा दशरथ माने परिवर्तन मेळाव्यातून दिला आहे

# बोपदेव घाटात मुलीवर सामूहिक अत्याचार करणारे तिन्ही नराधम पोलिसांच्या ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील बोपदेव घाटात रात्री आपल्या मित्रासोबत फिरण्यासाठी गेलेल्या एका २१ वर्षीय तरुणीवर आणि तिच्या मित्रावर हल्ला केला. शस्त्राचा आणि लाकडी दांडक्यांचा धाक दाखवत त्यांच्याजवळ असेलल्या वस्तू घेऊन तरूणाला झाडाला बांधून ठेवण्यात आलं तर तरूणीवर तिघांनी सामूहिक अत्याचार केला. या घटनेतील तीन आरोपी फरार होते, घटनेची सखोल चौकशी सुरु होती. आता अखेर पोलिसांच्या हाती मोठे यश लागले आहे. याप्रकरणी तीन संशयित आरोपींनी पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बोपदेव घाटामध्ये २१ वर्षीय तरूणीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यातील एका संशयित आरोपीला पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तर इतर दोन आरोपींना नागपुरातून ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे. ताब्यात घेतलेल्यांची सखोल चौकशी सुरु आहे. या प्रकरणी अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही, अशी माहिती पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली आहे.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलिसांच्या ६० टीम पोलिसांनी तयार केल्या होत्या. मात्र घटनेच्या ९ दिवसानंतरही आरोपी मोकाट असल्याने पुणे पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत होते. त्यामुळे सगळीकडून या घटनेचा आणि पोलिसांच्या तपासावर संताप व्यक्त केला जात होता. आरोपींचे स्केच तयार केले आहेत. शिवाय आरोपीची माहिती देणाऱ्याला १० लाखाचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. आतापर्यंत रेकॉर्डवरील ४०० गुन्हेगारांची झाडझडती घेण्यात आली आहे. बोपदेव घाट गँगरेप प्रकरणात नऊ दिवस उलटून गेले तरी पोलिसांना अजूनही आरोपींचा कुठलाही मागमूस लागत नाही त्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. शहर पोलिसांच्या तब्बल ६० टीम वेगवेगळ्या दिशेने या आरोपींचा शोध घेत आहेत. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक डाटा यांच्या मदतीने पोलिसांचा तपास सुरू आहे. मात्र, मोबाईल फोनला रेंज नसलेला परिसर आणि तब्बल दहा किमी अंतरापर्यंत सीसीटीव्ही नसल्याने पोलिसांच्या तपासात अडचण निर्माण झाली आहे. बोपदेव घाटाच्या सासवडच्या बाजूला तीन संशयिताच एक सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना मिळाले आहे. त्या अनुषंगाने पोलिसांनी तपास सुरू केला आहे. घटना घडल्याच्या वेळेनंतर साधारण १५ मिनिटांनी हे संशयित पुढे जाऊन थांबले असले असावेत असा संशय पोलिसांना आहे. या घटनेनंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणातील संशयित आरोपीचे स्केच कोंढवा पोलीस स्टेशनने प्रसिध्द केले होते. याबाबत काही माहिती मिळाल्यास खालील त्वरित संपर्क साधावा असे पोलीसांनी आवाहन केले होते.

# 'पोलिस पाटलांचे प्रलंबित मानधन लवकर द्या'

ओझर । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील पोलिस पाटील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रलंबित मानधनाबाबत जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, जिल्हाध्यक्ष रावसाहेब राळे, संघटनेचे पदाधिकारी व पोलिस पाटील उपस्थित होते.

दिलेल्या निवेदनात म्हटले की, राज्य मंत्रिमंडळाने विधानसभेच्या अधिवेशनात राज्यभरातील पोलिस पाटलांना प्रति महिना पंधरा हजार रुपये मानधन देण्याचे जाहीर करून त्याबाबतचा अध्यादेशही जारी केला होता. परंतु, त्यानंतर अनेक महिने राज्यातील पोलिस पाटलांना मार्च अगोदरचे आणि एप्रिलपासून वाढीव दराप्रमाणे मानधन मिळाले नव्हते. पोलिस पाटील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा केला तेव्हा एप्रिल महिन्याचे दोनशे रुपयांची कपात करून १४,८ रुपये मानधन पाटलांच्या पदरात पडले. त्यानंतर मानधनाचा एकही रुपया पोलिस पाटलांना अद्याप मिळालेला नाही. अनेक पोलिस पाटलांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह मानधनावर अवलंबून आहे. पोलिस पाटलांवर उपासमारीची वेळ येऊ नये म्हणून मे महिन्यापासूनचे प्रलंबित मानधन १५००० प्रति महिन्याप्रमाणे लवकरात लवकर पोलिस पाटलांच्या बँक खात्यात वर्ग करावे. अनेकदा पोलिस पाटलांचे मानधन वेळेवर वर्ग होण्यासाठी पोलिस अधिक्षक कार्यालय व ट्रेझरीकडून दिरंगाई होते, ती होऊ नये, त्यासाठी सूचना करण्याची विनंती केली आहे. पोलिस पाटलांचे मानधन वेळेवर जमा होण्यासाठी विशेष लक्ष देणार असल्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.



# दसऱ्यानिमित्त श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग येथे पहिल्यांदाच होणार भव्य रावण दहन सोहळा

**पुणे । प्रतिनिधी**

यंदाच्या दसऱ्याचे औचित्य साधून श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग येथे १२ ऑक्टोबर रोजी (शनिवारी) प्रथमच भव्य रावण दहन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुणेकरांसाठी हा सोहळा खास असून, मंदिराच्या इतिहासात पहिल्यांदाच रावणाच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात येणार आहे.

दसरा म्हणजे चांगुलपणाचा विजय, दुष्ट प्रवृत्तींचा अंत होय आणि या दहन सोहळ्याच्या माध्यमातून समाजातील विविध समस्यांवर प्रकाश टाकून त्यांचा नाश करण्याचा संदेश देण्याचा प्रयत्न आहे. रावण दहनाच्या या प्रतीकात्मक सोहळ्यात रावणरूपी १० प्रमुख सामाजिक समस्यांचा अंत करण्याचे प्रतिकात्मक चित्रण केले जाणार आहे. या समस्यांमध्ये पुढील मुद्द्यांचा समावेश आहे.

# आईनेच केला प्रियकराच्या मदतीने मुलाचा खून

**वाघोली । प्रतिनिधी**

आईनेच आपल्या प्रिकराच्या मदतीने मुलाचा डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना लोणीकंद येथे गुरुवारी रात्री साडेबाराच्या सुमारास घडली. या प्रकरणी दोघांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिल लालसिंग ठाकुर (वय-३०, रा. लोणीकंद) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. सुमित्रा लालसिंग ठाकुर (वय-५५, रा. लोणीकंद) व प्रफुल पुंडलिक ताथोड (वय-३५, रा. लोणीकंद) यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अनिलचा भाऊ सुनील लालसिंग ठाकुर (वय-३२, रा. पेरणेफाटा) याने फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमित्रा व प्रफुल यांच्यामध्ये अनैतिक संबंध होते. या कारणावरून सुमित्रा व अनिल यांच्यामध्ये कडाक्याचे भांडण झाले होते. याच रागातून अनिल याच्या डोक्यात त्याची आई सुमित्रा हिने प्रियकर प्रफुल्ल याच्या मदतीने डोक्यात दगड टाकून खून केला. अधिक तपास लोणीकंद पोलीस करीत आहेत.

# स्वराज्य पक्ष भाजपची बी टीम नाही; छत्रपती संभाजीराजेंची स्पष्टोक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील काही नेतेमंडळी महाराष्ट्र स्वराज्य पक्ष हा भाजपची बी टीम आहे, असा प्रचार करत आहेत. तसे काही संदेश पण मला आले. मात्र, महाराष्ट्र स्वराज्य पक्ष हा भाजपची बी टीम नाही अशी स्पष्टोक्ती छत्रपती संभाजीराजे यांनी पुणे येथील मेळाव्यामध्ये केली. त्याचप्रमाणे येत्या निवडणुकीत समविचारींना अन् विस्तापितांना सोबत घेऊन प्रस्थापितांना धडा शिकवू, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या स्थापना दिन सोहळयानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी पक्षाचे सरचिटणीस डॉ. धनंजय जाधव, उपाध्यक्ष अंकुश जाधव, रघुनाथ चित्रे पाटील, महादेव तळेकर यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत मी काँग्रेसचा प्रचार केला तेव्हा भाजपची बी टीम का म्हणाले नाही. थेट पंतप्रधान यांना मी शिवस्मारकाबाबत जाहीर प्रश्न केला. हा प्रश्न विचारण्याची कुणाची हिंमत झाली नाही. प्रत्येकाला तुरुंगात जाण्याची भीती असते. मग स्वराज्य पक्ष भाजपची बी टीम कशी होईल. राजकारण माझा पिंड नाही. पण, राजकारणात चांगली लोक यावीत म्हणून मी राजकारणात आलो आहे. समविचारींना बरोबर




घेऊन परिवर्तन महाशक्ती तयार करून विधानसभा जिंकणार, असा निर्धार ही संभाजीराजे यांनी यावेळी व्यक्त केला. संभाजीराजे म्हणाले, राज्यात सध्या सहकार क्षेत्राचे खासगीकरण झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांकडेच साखर कारखाने आहेत. शरद पवार, रोहित पवार, पंकजा मुंडे, विनय कोरे, धनंजय मुंडे, अजित पवार यांच्याकडे किती साखर कारखाने आहेत याची माहिती घ्या. सहकार हा मोडीत काढण्याचा प्रकार सुरु असल्याची टिका ही त्यांनी यावेळी केली.

केंद्र सरकारने मराठी भाषेला आभिजात भाषेचा दर्जा दिला, ही आनंदाची आणि कौतुकाची बाब आहे. मात्र किती जिल्हा परिषद अथवा मराठीच्या शाळा अस्तित्वात आहेत. आरोग्य, शिक्षणावर आपण किती खर्च करतो, लाडकी बहिण योजनेवर किती खर्च करतो याचाही विचार व्हावा. शेतकर्यांना वार्षिक निधी सरकार देते मात्र दुसर्या बाजुला सर्व खते-बियाणे यावर जीएसटीच्या मार्फत परत वसुली करीत आहे. आमच्या पक्षाला आणि आम्हाला तुच्छ लेखले जात आहे. परंतु, आम्ही आगामी काळात आमच्या कामातून आणि कर्तृत्वानेच त्यांना उत्तर देऊ, असा टोलाही संभजीराजे यांनी शरद पवारांना लगावला.

# बंगल्याच्या आवारात लपलेल्या बछड्याला सोडले

**जुन्नर । प्रतिनिधी**

मांजरवाडी (ता. जुन्नर) येथील बंगल्याच्या आवारातील जनावरांच्या गोठ्यात लपून बसलेल्या बिबट बछड्याला पकडून वन विभागाच्या रेस्क्यू टीमने त्याची त्याच्या आईशी भेट घडवली. याच वेळी त्याची आई बंगल्याजवळील ज्वारीच्या शेतात आक्रमक पवित्र्यात होती. वन अधिकार्यांनी प्रसंगावधान राखत त्या बछड्याला बंगल्याच्या संरक्षक भिंतीवरून बाहेर काढून दिले. हा बछडा अंदाजे ५ महिने वयाचा होता.



कारवस्तीत शेतकरी भाऊ साळबा मुळे यांचा बंगला आहे. याच बंगल्याच्या आवारात असलेल्या जनावरांच्या गोठ्यात बिबट्याचा बछडा बुधवारी (दि. ९) सायंकाळी साडेसातच्या सुमारास आला आणि तेथे लपून बसला. साधारण पावणेअकरा वाजेपर्यंत तो बंगल्यात होता.

बछडा दिसताच मुळे कुटुंबीयांनी तातडीने वन विभागाला कळवले. त्यानुसार वनपाल अनिता होले यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, आपदा मित्र सुशांत भुजबळ, रेस्क्यू टीम सदस्य आदित्य डेरे, सुशील ढवळे, स्वप्निल पाटे, सुशांत भुजबळ, मांजरवाडीचे पोलिस पाटील सचिन टाव्हरे, रामकृष्ण चोपडा, तुषार टेके, डॉ. महेंद्र ढोरे, शिवाजी थोरात, संतोष मुळे, मोहन मुळे, सुयोग भापकर आदी ग्रामस्थ तेथे दाखल झाले.

बछड्याला रेस्क्यू करत असताना बाजूच्या ज्वारीच्या शेतामध्ये असणारी त्याची आई मादी बिबट्या गुरगुर करत जवळ येत असल्याचे वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांना दिसले. त्यांनी प्रसंगावधान राखत ताबडतोब रेस्क्यू टीमला सावध केले. तो बछडा न पकडता त्याला संरक्षक भिंतीच्या बाहेर त्याच्या आईच्या दिशेने सोडून दिले. त्यानंतर तो आईच्या कुशीत विसावला. काही वेळाने दोघेही तेथून निघून गेले.

मंगळवारी (दि. ८) एक बछडा याच परिसरात वन विभागाने लावलेल्या पिंजर्यात अडकला आहे. त्यानंतर दुसराही बछडा पकडला जाऊ शकत होता. मात्र, दोन्ही बछडे दुरावल्याने त्यांची आई आक्रमक होण्याची शक्यता होती, त्यामुळे हा दुसरा बिबट्या पकडून सोडून देण्यात आला, असे वन विभागाकडून सांगण्यात आले. गावात आत्तापर्यंत १२ ते १३ बिबटे पकडण्यात आले आहेत व अजूनही या भागात बिबट्यांचा वावर दिसून येत आहे. या भागात अजूनही १० ते १५ बिबटे असल्याचा अंदाज आहे. प्रचंड प्रमाणात बिबटे असल्याने ठोस निर्णय घ्यावा; अन्यथा ग्रामस्थ आक्रमक झाल्यास जबाबदार कोण, असा प्रश्न निर्माण झाला आहे

# 'महाराष्ट्राला नाना भाऊच मुख्यमंत्री हवेत', पुण्यात नाना पटोलेंचे झळकले बॅनर्स, राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

पुणे : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार आहे. तर महाविकास आघाडीत गेल्या काही दिवसांपासून मुख्यमंत्री कोण होणार? यावरून वाद सुरु असल्याचे चित्र आहे. त्यातच आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून पुण्यात बॅनर झळकल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

महाविकास आघाडी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर न करता विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार आहे. तर दुसरी ठाकरे गटाकडून मुख्यमंत्री कोण असेल हे जाहीर करावं, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. त्यातच आता नाना पटोले




यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर झळकले आहेत. यामुळे महाविकास आघाडीत वादाची ठिणगी पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महाराष्ट्राला नाना भाऊच मुख्यमंत्री हवे...

पुण्यात लवकरच नानापर्व! अशा आशयाचे बॅनर झळकले आहेत. या बॅनरवर नाना पटोले यांचा भावी मुख्यमंत्री म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. महाराष्ट्राला नाना भाऊच मुख्यमंत्री हवे, असा मजकूर देखील लिहिण्यात आलेला आहे. पुण्यात अनेक ठिकाणी नाना पटोले यांच्या समर्थनार्थ बॅनरबाजी करण्यात आली आहे. उद्या होणाऱ्या दसरा मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे (णववहर्ीं ढहरलज्ञशीू) मुख्यमंत्री पदाबाबत काय बोलणार? याची चर्चा सुरू असतानाच ही बॅनरबाजी करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

आता मुख्यमंत्री होणारच, नाना पटोलेंचा दावा

दरम्यान, भंडारा जिल्ह्यात खासदार प्रफुल्ल पटेल (झीर्षीश्र झरींशश्र) यांनी नाना पटोले यांचं नाव न घेता भावी हे भावीच, राहतील असं वक्तव्य केले होते. त्यावर नाना पटोले यांनी उत्तर देताना सांगितले होते की, मला आमदार होऊ देत नव्हते, आमदार झालो. खासदार होऊ देत नव्हते, खासदार झालो. विधानसभा अध्यक्ष सुध्दा झालो. आता मुख्यमंत्री होणारच, असं वक्तव्य नाना पटोले यांनी काल केले होते. या पाठोपाठ आज नाना पटोले यांचे भावी मुख्यमंत्री बॅनर झळकल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.